

**श्रीज्ञानेश्वरी**

## अध्याय सतरावा

या अध्यायाला श्रद्धात्रयविभागयोग असे नांव दिले आहें . कर्मयोगशास्त्राप्रमाणे जगाचे धारण-पोषण करणारे पुरुष कोणत्या प्रकारचे आणि जगाचा नाश करणारे कोणत्या प्रकारचे याचे वर्णन झाल्यावर मनुष्या मनुष्यात भेद का होतात याचा खुलासा सातव्या अध्यायात आला आहे. परंतु सत्त्व,रज व तम या गुणांचे विवेचन तेव्हां केले नसल्यामुळे या प्रकृती मुळे होणाऱ्या भेदांचे विवेचन चौदाव्या अध्यायात केले आहें .आतां या त्रिगुणाधारीत श्रद्धेचे जें भेद पडतात त्याचे विवेचन या अध्यायात आले आहें.म्हणून हा श्रद्धात्रय विभाग.

यात 27 श्लोक असून त्यावर 433 ओव्या आहेत. इतर सर्व अध्यांप्रमाणे या अध्यायात 20 व्या ओवीपर्यंत श्रीनिवृत्तिनाथांची स्तुती आहें व त्या ओव्या कठीण आहेंत व त्यांचा अर्थ या अध्यायाचे शेवटी दिला आहें म्हणून त्यातील सर्व कठीण शब्दांचा अर्थ दिला नाही.

यातील 58,74,218 या ओव्या फार सुंदर आहेत.

**श्रीज्ञानेश्वरी**
**अध्याय सतरावा**

विश्वविकासित मुद्रा । जया सोडी तुझी योगनिद्रा ।
तया नमोजी गणेंद्रा । श्रीगुरुराया ।।+1।।
त्रिगुणत्रिपुरी [1] वेढिला । जीवत्वदुर्गी आडिला । 1 तीनगुण रुपी नगरांत
तो , आत्मशंभूने सोडविला । तुझिया स्मृती ।।+2।।
म्हणौनि , शिवेसी कांटाळा [2] । गुरत्वे तूंचि आगळा , । 2 तुलनेने
तऱ्ही , हळु [3] , मायाजळा-। माजी तारूनि ।।+3।। 3 हलका
जे तुझ्याविखी मूढ । तयांलागी तूं वक्रतुंड ।
ज्ञानियांसी तरी अखंड । उजूचि आहासी ।।+4।।
दैविकीं दिठी पाहतां सानी , । तऱ्ही , मीलनोन्मीलनी [4] । 4 उघडझाप करताच
उत्पत्ति प्रळयो दोन्ही । लीलाचि करिसी ।।+5।।
प्रवृत्तिकर्णाच्या चाळी [5] । उठली मदगंधानिळी । 5 हालवण्याने
पूजीजसी नीलोत्पली । जीवभृंगांच्या ।।+6।।
पाठी निवृत्तिकर्णताळे । आहाळली [6] ते पूजा विधुळे [7] । 6 उधळलेलेली 7 नाश पावते
तेव्हां मिरविसी मोकळे । आंगाचे लेणे ।।+7।।
वामांगीचा लास्यविलासु । जो हा जगद्रूप आभासु ।
तो तांडवमिसे कळासु [8] । दाविसी तूं ।।+8।। 8 कौशल्याने
हें असो ,विस्मो दातारा ! । तूं होसी जयाचा सोयरा , ।
सोइरिकेचिया व्यवहारा । मुकेचि तो ।।+9।।
फेडितां बंधनाचा ठावो , । तूं जगद्बंधु ऐसा भावो , ।
धरूं वोळगे उवावो [9] । तुझाचि आंगी ।।+10।। 9 प्रशास्त सेवा
तंव दुजयाचेनि नांवे । देहही नुरेचि , पै देवराया ! ।
जेणे तूं आपणपयां । केलासि दुजा ।।+11।।
तूंतें करूनि पुढे । जे उपाये घेती दवडे [10] । 10 धांव
तयां ठासी बहुवे पाडे । मागांचि तूं ।।+12।।
जो ध्याने सूये मानसी । तयालागी नाही तूं त्याचे देशी ।
ध्यानही विसरे तेंणेसी । वालभ [11] तुज ।।+13।। 11 प्रेम
तूंतें सिद्धचि जो नेणे । तो नांदे सर्वज्ञपणे ।
वेदांही येवढे बोलणे । नेघसी कानी ।।+14।।
मौन गा तुझें राशिनांव । आतां स्त्रोत्री के बांधो हांव ? ।
दिसती तेतुली माव । भजो काई ? ।।+15।।
दैविके सेवकु हो पाहो । तरी भेदिता द्रोहोचि लाहो ।
म्हणौनि आतां कांही नोहो । तुजलागी जी ।।+16।।

जै सर्वथा सर्वही नोहिजे । तै अद्वय तूंते लाहिजे ।
हें जाणो मी वर्म तुझें । आराध्य लिंगा ।।+17।।
तरी , नुरोनि वेगळेपण , । रसी भजिन्नले लवण ।
तैसे , नमन माझे जाण । बहु काय बोलो ? ।।+18।।
आतां , रिता कुंभ समुद्री रिगे । तो उचंबळत भरोनि निगे ।
कां , दशी [1] दीपसंगे । दीपुची होय ।।+19।। — 1 वात
तैसा , तुझिया प्रणिती । मी पूर्ण जाहलो श्रीनिवृत्ती ।
आतां आणीन व्यक्ती । गीतार्थु तो ।।+20।।
तरी षोडशाध्यायशेखी । तिये समाप्तीच्या श्लोकीं ।
जो ऐसा निर्णयो निष्टंकी [2] । ठेविला देवे ।।+21।। — 2 निश्चितपणे
जे कृत्याकृत्यव्यवस्था । अनुष्ठावया [3] , पार्था ! । — 3 आचरावयास
शास्त्रचि एक सर्वथा । प्रमाण तुज ।।22।।
तेंथ , अर्जुन मानसे । म्हणे , '' हे ऐसे कैसे ? ।
जे शास्त्रेवीण नसे । सुटिका [4] कर्मा ? ।।23।। — 4 मोकळिक
तरी , तक्षकाची फडे । ठाकोनि , कै तो मणि काढे ? ।
कै नाकीचा केशु जोडे । सिंहाचिये ? ।।24।।
मग तेणे तो वोविजे । तरीच लेणे पाविजे ।
एऱ्हवी काय असिजे । रित्तकंठी ? ।।25।।
तैसी,शास्त्रांची मोकळी[5],। यां कै ,कोण पां वेटाळी [6]? । — 5 मतभेद 6 आवरणे
एकवाक्यतेच्या फळी , । पैसिजे [7] कै ? ।।26।। — 7 प्रवेश करणे
जालयाही एकवाक्यता । कां,लाभे वेळु अनुष्ठिता [8] ?। — 8 आचरण्यास
कैचा पैसारु [9] जीविता ।येतुलालिया ? ।।27।। — 9 विस्तार
आणि,शास्त्रे,अर्थे,देशे,काळे,। या चहूही जे एकफळे [10] । — 10 एकत्र होण्याला
तो उपावो के मिळे । आघवयांसी ? ।।28।।
म्हणौनि , शास्त्राचे घडते [11] । नोहे, प्रकारे बहुते ! । — 11 शास्त्रातील निर्णय
तरी , मूर्खा , मुमुक्षा येथे । काय गती पां ? ।।29।।
हा पुसावया अभिप्रावो । जो अर्जुन करी प्रस्तावो [12] । — 12 आरंभ
तो सतराविया ठावो । अध्याया येथ ।।30।।
तरी सर्वविषयी वितृष्णु [13] । जो सकळकळी [14] प्रवीणु , । — 13 निरिच्छ 14 सर्व कलांमध्ये
कृष्णाही नवल कृष्णु [15] , । अर्जुनत्वे जो ।।31।। — 15 कृष्णालाही आकर्षीत
शौर्या जोडला आधारु , । जो सोमवशाचा शृंगारु । — करणार अर्जुनरुप कृष्ण
सुखादि उपकारु । जयाची लीला ।।32।।
जो प्रज्ञेचा प्रियोत्तमु । ब्रह्मविद्येचा विश्रामु ।
सहचरु मनोधर्मु । देवाचा जो ।।33।।

**अर्जुन उवाच**

**ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयाऽन्विताः ।**
**तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तम ः ।।1।।**

**अर्जुन म्हणाला- हे कृष्णा ! श्रद्धेने युक्त असूनहि शास्त्रातील विधि सोडून जे यजन करितात, त्यांची निष्ठा म्हणजे मनाची स्थिती कोणती बरे समजावयाची? सात्त्विक कीं राजस कीं तामस ?**

तो अर्जुन म्हणे गां,''तमालश्यामा [1] । इंद्रियां फांवलिया [2]ब्रह्मा ! ।
तुझा बोलु आम्हां । साकांक्षु [3] पै ,जी ! ।।34।।
जे शास्त्रेवाचूनि आणिके । प्राणिया स्वमोक्षु न देखे , ।
ऐसे कां कैपंखे [4] । बोलिलासी ? ।।35।।
तरी , न मिळेचि तो देशु , । नव्हेचि काळा अवकाशु [5] , ।
जो करवी शास्त्राभ्यासु , । तोही दुरी ।।36।।
आणि , अभ्यासी विरजिया [6] । होती जिया सामुग्रिया , ।
त्याही नाही आपैतिया [7] । तिये वेळी ।।37।।
उजु [8] नोहेचि प्राचीन , । नेदीचि प्रज्ञा संवाहन [9] ।
ऐसे ठेले आपादन [10] । शास्त्राचे जया ।।38।।
किंबहुना , शास्त्रविखी , । एकही न लाहातीचि नखी [11] ।
म्हणौनि , उखिविखी [12] । सांडिली जिही ।।39।।
परी , निर्धारूनि शास्त्रे , । अर्थानुष्ठाने [13] पवित्रे , ।
नांदताती , परत्रे [14] । साचारे [15] जें ।।40।।
तयां ऐसे आम्ही होआवे , । ऐसी चाड [16] बांधोनि जीवे ।
घेती तयांचे मागावे [17] , । आचरावया , ।।41।।
धड्याचिया आखरां-।तळी [18], बाळ लिहे , दातारा ! ।
कां,पुढांसूनि पडिकरा [19](काठिकरा )।अक्षमु [20] चाले ।।42।।
तैसे , सर्वशास्त्रनिपुण । तयाचे जे आचरण ।
तेचि करिती प्रमाण , । आपलिये श्रद्धे ।।43।।
मग शिवादिके पूजने । भूम्यादिके महादाने ।
अग्निहोत्रादि यजने । करिती जे श्रद्धा ।।44।।
तयां सत्त्वरजतमां-।माजी , कोण , फुरुषोत्तमा ! ।
गति होय ? ते आम्हां । सांगिजो जी ! '' ।।45।।
तंव , वैकुंठपिठीचे लिंग , । जो निगमपद्माचा [21] पराग ।
जिये जयाचेनि हे जग , । अंगच्छाया [22] ।।46।।
काळ सावियाचि [23] वाढु । लोकोत्तर प्रौढु ।
अद्धितीय गूढु । आनंदघनु ।।+47।।
इये श्लाघिजती [24] जेंणे बिके [25]।ते जयाचे आंगी असिके [26] ।
तो श्रीकृष्ण स्वमुखे । बोलत असे ।।+48।।

1 तमालवृक्षाप्रमाणे शामल
2 अनुभवलेल्या 3 संशययुक्त
4 कोणाची बाजु व पक्ष घेऊन
5 धीर
6 मदत करणाऱ्या
7 स्वाधीन
8 अनुकुल 9 सहायकारक
10 संपादन
11 आधार
12 चर्चा
13 शास्त्रोक्त आचरणाने
14 परलोकीं 15 सुखाने
16 इच्छा
17 मार्ग
18 अक्षरा प्रमाणे
19 डोळसाला समोर घालून 20 आंधळा
21 वेदरुपी कमळाचा
22 आश्रय करून
23 स्वभावतः
24 कामना 25 बलवान होते 26 असते

**श्रीभगवानुवाच**

**त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।**
**सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ।।2।।**

**श्रीभगवान म्हणाले- प्राणिमात्राची ही श्रद्धा स्वभावतः तीन प्रकारची असते; सात्त्विक,राजस व तामस . कशी ते ऐक .**

म्हणे , "पार्था ! तुझा अतिसो [1] । हेही आम्ही जाणतसो । — 1 कल
जे शास्त्राभ्यासाचा आडसो [2] । मानितोसि की ।।49।। — 2 अडथळा
नुसधियाचि श्रद्धा । झोंबो पाहसी परमपदा , ।
तरी तैसे हें प्रबुद्धा । सोहोपे नोहे ! ।।50।।
श्रद्धा म्हणितलियासाठी , । पातेजो नये [3] किरीटी ! । — 3 विश्वास ठेवु नये
काय द्विजु , अंत्यजघृष्टी [4] । अंत्यजु नोहे ? ।।51।। — 4 नीच लोकांच्या संबंधाने
गंगोदक जरी जाले , । तरी मद्यभांडां आले ।
तें घेऊं न ये काही केले , । विचारी पां ! ।।52।।
चंदनु होय शीतळु , । परी अग्नीसी पावे मेळु , ।
तै हाती धरिता , जाळू । न शके काई ? ।।53।। — 5 हीण सोने आटत
कां ,किडाचिये आटतिये पुटी [5] , । पडिले सोळे [6] किरीटी ! । — असताना 6 शुद्ध सोने
घेतले चोखासाठी [7] , । नागवीना [8] ? ।।54।। — 7 शुद्ध म्हणून 8फसणार नाही का
तैसे , श्रद्धेचे दळवाडे [9] । अंगे कीर चोखडे , । — 9 श्रद्धेचे समुदाय
परी प्राणियांच्या पडे । विभागी जै , ।।55।।
तें प्राणिये तंव स्वभावे । अनादिमायाप्रभावे ।
त्रिगुणाचेचि आघवे । वळिले [10] आहाती ।।56।। — 10 बनलेले आहे त
तेंथही , दोन गुण खांचती [11] । मग एक धरी उन्नती । — 11 कमी होतात
तै , तैसियाचि होती वृत्ती । जीवांचिया ।।57।।
**वृत्तीऐसे मन धरिती , । मनाऐसी क्रिया करिती , ।**
**केलियाऐसी वरिती । मरोनि देहे ।।58।।**
बीज मोडे झाड होये , । झाड मोडे , बीजी सामाये ।
ऐसेनि कल्पकोडी [12] जाये । परी जाति न नशे ।।59।। — 12 कोट्ट्यावधी कल्प
तियापरी , यिये अपारे । होत जात जन्मांतरे ।
परी त्रिगुणत्व न व्यभिचरे [13] । प्राणियांचे ।।60।। — 13 बदलत नाही
म्हणौनि , प्राणियांच्या पैकी । पडिली श्रद्धा , अवलोकीं ।
तें होय गुणासरिखी । तिही ययां ।।61।।
विपाये वाढे सत्त्व शुद्ध । तेव्हां ज्ञानासी करी साद ।
परी एका दोघे वोखद [14] । येर आहाती ।।62।। — 14 विरुद्ध

सत्त्वाचेनि आंगलगे [1] । तें श्रद्धा मोक्षफळा रिगे , ।
तंव , रज तम उगे । कां पां राहाती ! ।।63।।
मोडोनि सत्त्वाची त्राये [2] । रजोगुण आकाशी जाये, ।
तेव्हां तेचि श्रद्धा होये । कर्मकेरसुणी [3] ।।64।।
मग तमाची उठी आगी , । तेव्हां तेचि श्रद्धा भंगी [4] ।
हो लागे भोगालागी । भलतेया ।।65।।

1 आश्रयाने
2 आश्रय
3 कर्म करणारी
4 श्रद्धेचा प्रकार

**सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।**
**श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्ध ः स एव सः ।।3।।**

**सर्व लोकांची श्रद्धा हें भारता! त्यांच्या त्यांच्या सत्त्वाप्रमाणे म्हणजे प्रकृतिस्वभावाप्रमाणे होत असते. मनुष्य हा श्रद्धामय आहे . ज्याची ज्या ठीकाणी श्रद्धा असते त्याप्रमाणे तो बनत असतो.**

एवं , सत्त्वरजतमा-।वेगळी श्रद्धा , सुवर्मा ! ।
नाही गा ! जीवग्रामा-। माजी , यया ।।66।।
म्हणौनि , श्रद्धा स्वाभाविक । असे पै , त्रिगुणात्मक ।
रजतमसात्त्विक , । भेदी इही ।।67।।
जैसे , जीवनचि उदक , । परी , विषी होय मारक , ।
कां , मिरयामाजी तीख , । उंसी गोड ।।68।।
तैसा बहुवसे तमे , । जो सदाचि होय , निमे ।
तेंथ , श्रद्धा परिणमे । तेचि होऊनि ।।69।।
मग काजळा आणि मसी । न दिसे विवंचना [5] जैसी , ।
तेवी श्रद्धा तामसी । सिनी [6] नाही ।।70।।
तैसीच ,राजसी जीवी ।रजोमय जाणावी ।
सात्त्विकीं आघवी । सत्त्वाचीच ।।71।।
ऐसेनि , हा सकळु । जगडंबरु निखिळु [7] ।
श्रद्धेचाचि केवळु । वोतला असे ।।72।।
परी , गुणत्रयवशे , । त्रिविधपणाचे लासे [8] ।
श्रद्धे जे उठिले असे , । ते वोळख तूं ।।73।।
**तरी , जाणिजे झाड फुले , । कां , मानस जाणिजे बोले , ।**
**भोगे जाणिजे , केले । पूर्वजन्मीचे ।।74।।**
तेसी जिही चिन्ही । श्रद्धेची रूपे तिन्ही ।
देखिजती , ते वानी [9] । अवधारी पां ! ।।75।।

5 भेद
6 वेगळी
7 केवळ
8 चिन्हाने
9 वर्णन करुं

**यजन्ते सात्त्विका देवान् यक्षरक्षांसि राजसाः ।**
**प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ।।4।।**

**सात्त्विक म्हणजे सत्त्वगुणप्रधान स्वभावाचे जे पुरुष , ते देवांचे यजन करितात; राजस यक्षराक्षसांचे, आणि याशिवाय बाकीचे तामस प्रेत व भूतगण यांचे यजन करितात.**

| | |
|---|---|
| तरी , सात्त्विक श्रद्धा । जयांचा होय बांधा [1] । | 1 ज्यांच्या घडणीत असते |
| तयां बहुतकरूनि मेधा [2] । स्वर्गी आथी ।।76।। | 2 बुद्धी |
| तें विद्याजात पढती , । यज्ञक्रिये निवडती , । | |
| किंबहुना पडती । देवलोकी ।।77।। | |
| आणि , श्रद्धा राजसा । घडले जे , वीरेशा ! । | |
| तें भजती राक्षसां ,। खेचरां [3] हन ।।78।। | 3 यक्ष |
| श्रद्धा जें कां तामसी , । ते मी सांगेन तुजपाशी , । | |
| जे कां केवळ पापराशी । अतिकर्कशी [4] , निर्दयत्वे ।।79।। | 4 अति क्रूर |
| जीववधे [5] साधूनि , बळी । भूतप्रेतकुळे , मैळी । | 5 प्राणीहत्या करून |
| स्मशानी , संध्याकाळी । पूजिती जे ।।80।। | |
| तें , तमोगुणाचे सार । काढूनि , निर्मिले नर , । | |
| जाण तामसियेचे घर । श्रद्धेचे तें ।।81।। | |
| ऐसी , इही तिही लिंगी । त्रिविध श्रद्धा जगी , । | |
| पै , हे ययालागी । सांगतु असे , ।।82।। | |
| जे, हे सात्त्विक श्रद्धा । जतन करावी प्रबुद्धा । | |
| येरी दोनी विरुद्धा । सांडाविया ।।83।। | |
| हें सात्त्विकमति जया । निर्वाहती [6] होय , धनंजया ! । | 6 रक्षण करणारी |
| बागुल [7] नोहे तया । कैवल्य ते ।।84।। | 7 बाऊ |
| तो न पढो कां ब्रह्मसूत्र [8] । ना लोढो [9] सर्व शास्त्र ,। | 8 वेद 9 परिशीलन न करो |
| सिद्धांत न होत स्वतंत्र । तयाच्या हाती , ।।85।। | |
| परी श्रुतिस्मृतीचे अर्थ । जे आपण होऊनि मूर्त [10] , । | 10 मूर्तीमंत |
| अनुष्ठाने [11] जगा देत । वडील [12] जें हे ।।86।। | 11 आचरणाने 12 विद्वान |
| तयांची आचरती पाउले । पाऊनि , सात्त्विकी श्रद्धा चाले , । | पूर्वज |
| तो , तेचि फळ ठेविले । ऐसे लाहे [13] ।।87।। | 13 प्राप्त होईल |
| पै , एक दीपु लावी सायासे , । आणिक तेथे लाऊं बैसे , । | |
| तरी तो काय प्रकाशे । वंचिजें [14] गा ? ।।88।। | 14 मुकतो |
| कां , येके मोल अपार । वेचोनि , केले धवळार [15] । | 15 चुने गच्ची घर |
| तो सुरवाडु [16] ,वस्तिकर [17] , । न भोगी काई ? ।।89।। | 16 सुख 17 घरात राहणारे |
| हें असो ; जो तळे करी , । ते तयाचीच तृषा हरी ? । | इतर |
| की , सुआरासीचि [18] अन्न , घरी । येरां नोहे ? ।।90।। | 18 स्वयंपाक करणाऱ्यासच |
| बहुत काय बोलो पै गा ! । येका गौतमासीचि गंगा , । | |
| येरा समस्तां काय जगां । वोहोळ [19] जाली ? ।।91।। | 19 ओढा |

म्हणौनि , आपुलियापरी । शास्त्र अनुष्ठिती कुसरी [1] ।
जाणे , तयाते श्रद्धाळु जो वरी , । तो मूर्खुही तरे ।।92।।

**अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः ।**
**दम्भाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विता ः ।।5।।**

**परंतु जे लोक दंभ व अहंकार यांनी युक्त होत्साते, काम आणि आसक्ति यांच्या जोरावर , शास्त्रविरुद्ध घोर तप करितात,**

ना,शास्त्राचेनि कीर नांवे,। खाकरोही [2] नेणती जीवे ।
परी शास्त्रज्ञांही शिवे [3] । टेको नेदिती ।।93।।
वडिलांचिया क्रिया । देखोनि , वाती वांकुलिया [4] ।
पंडितां डाकुलिया [5] । वाजविती ।।94।।
आपुलेनीचि आटोपे [6] , । धनित्वाचेनि दर्पे , ।
साचचि पाखंडाची [7] तपे । आदरिती ।।95।।
आपुलिया , पुढिलांचिया । आंगी , घालूनि कातिया [8] ।
रक्तमांसा प्रणीतया [9] । भर भरु ।।96।।
रिचविती [10] जळतकुंडी , । लाविती चेड्याच्या [11] तोंडी ।
नवसियां देती उंडी । बाळकांची ।।97।।
आग्रहाचिया उजरिया [12] ,। क्षुद्र देवतां वरिया , ।
अन्नत्यागे सातरिया [13] । ठाकती एक ।।98।।
अगा ! आत्मपरपीडा । बीज तमक्षेत्री , सुहाडा ! ।
पेरिती , मग पुढां । तेचि पिके ।।99।।
बाहु नाही आपुलिया , । आणि , नावेतेही , धनंजया ! ।
न धरी , होय तया । समुद्री जैसे , ।।100।।
कां , वैद्याते करी सळा [14] । रसु [15] सांडी पाय खोळा [16] ।
तो रोगिया जेवी जिव्हाळा [17] । सवता [18] होय ।।101।।
नाना , पडिकराचेनि सळे [19] । काढी आपुलेचि डोळे , ।
तें वानवसां [20] , आंधळे । जैसे ठाके ।।102।।
तैसे तयां आसुरां होये । निंदूनि शास्त्रांची सोये [21] ।
सैंध धांवताती , मोहे , । आडवी [22] जें कां ।।103।।
कामु करवी ते करिती , । क्रोधु मारवी ते मारिती , ।
किंबहुना , माते पुरिती । दुःखाचा गुंडा [23] ।।104।।

1 कौशल्याने आचरण
2 आरंभ करणे
3 जवळ येऊ देत नाहीत
4 वेडाऊन दाखवितात
5 चुटक्या
6 घमेंडीने
7 नास्तिक
8 कोयता
9 यज्ञातले एक पात्र
10 ओततात 11 भूताच्या
12 हट्टाने
13 सात दिवस
14 द्वेष 15 काढा 16 लाथेने
17 स्वास्थ्य 18 विरुद्ध
19 डोळसाच्या द्वेषाने
20 माज घरात अडकून पडते
21 मार्ग
22 अरण्यात
23 दगडात

**कर्षयंतः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ।**
**मां चैवान्तःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ।।6।।**

**आणि शरीरातील पंचमहाभूतादिकांच्या समुदायासच नव्हे तर शरीरान्तर्गत असणाऱ्या मलाहि कष्टवितात, ते अविवेकी आसूर बुद्धीचे समज .**

आपुला परावां देही । दुःख देती जे जे काही , ।
मग आत्मया तेतुलाही ।होय शीणु ।।105।।
पै , वाचेचेनिहि पालवे [1] , । पापियां तया नातळावे [2] । — 1 पदराने 2 स्पर्श करू नये
परी पडिले सांगावे , । त्यजावया ।।106।।
प्रेत बाहिरे घालिजे , । कां , अंत्यजु संभाषणी त्यजिजे , ।
हें असो ; हाते क्षाळिजे [3] । कश्मलाते [4] ।।107।। — 3 धुणे 4 चिखलाने
तेंथ , शुद्धीचिया आशा , । तो लेपु [5] न मनवे जैसा , । — 5 दोष
तयांतें सांडावया तैसा । अनुवादु [6] हा ।।108।। — 6 सांगणे
तरी अर्जुना ! तूं तयांतें । देखसी , तै, स्मर हो माते ।
जे आन [7] प्रायश्चित्त येथे । मानेल ना ।।109।। — 7 दुसरे
म्हणौनि, श्रद्धा जे सत्त्विकीं, । पुढती तेचि पै, येकी ।
जतन करावी निकी । सर्वापरी ।।110।।
तरी धरावा तैसा संगु , । जेणे पोखे [8] सात्त्विक लागु । — 8 वाढतो
सत्त्ववृद्धीचा भागु । आहारु घेपे ।। 111।।
एऱ्हवी तरी पाही , । स्वभाववृद्धीच्या ठाई , ।
आहारावांचूनि नाही । बळी हेंतु [9] ।।112।। — 9 बळ येण्याकरता
प्रत्यक्ष पाहे पां वीरा ! । जो सावध घे मदिरा , ।
तो होऊनि ठाके माजिरा [10] । तियेचि क्षणी ।।113।। — 10 मदोन्मत्त
कां,जो साविया[11]अन्नरसु सेवी,।तो व्यापिजे वातश्लेष्मस्वभावी[12]। — 11 सहजच
काय , ज्वरु जालिया निववी । पयादिक ? ।।114।। — 12 वातकफादि विकृती
नातरी , अमृत जयापरी । घेतलिया , मरण वारी , ।
कां , आपुलियाऐसे करी । जैसे विष ।।115।।
तेवी , जैसा घेपे आहारु , । धातु तैसाचि होय आकारु , ।
आणि , धातुऐसा अंतरु [13] । भावो पोखे [14] ।।116।। — 13 अंतःकरणात 14 वाढतो
जैसे , भांडियाचेनि तापे , । आंतुले उदकही तापे , ।
तैसी , धातुवशे आटोपे । चित्तवृत्ती ।।117।।
म्हणौनि , सात्त्विकु रसु सेविजे । तै , सत्त्वाची वाढी पाविजे ।
राजसा , तामसा होईजें । येरी रसी ।।118।।
तरी,सात्त्विकु कोण आहारु ?।राजसा,तामसा,कायी आकारु ?।
हें सांगो करी आदरु [15] , । आकर्णनी [16] ।।119।। — 15 आरंभ करतो
16 ऐकण्याकरिता

**आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ।**
**यज्ञस्तपस्तथा दानं तेषां  भेदमिमं श्रृणु  ।।7।।**
**आतां प्रत्येकाला आवडणाऱ्या आहाराचेहि तीन प्रकार होतात, आणि तोच प्रकार यज्ञ,तप व दान यांचा होय. त्यांचा हा भेद सांगतो ऐक .**

आणि एकसरे [1] आहारा । कैसेनि तिनी मोहरा [2] । — 1 एकाच 2 तीन प्रकार
जालिया , तेही वीरा । रोकडे दाऊं ।।120।।
तरी , जेवणाराचिया रुची । निष्पत्ति की बोनियांची [3] , । — 3 पक्वान्नांची
आणि , जेवितां [4] तंव गुणांची । दासी [5] येथ ।।121।। — 4 जेवणारा 5 गुणांनी बद्ध असतो
जो जीव , कर्ता , भोक्ता , । तो गुणास्तव स्वभावता ।
पावोनियां , त्रिविधता । चेष्टे  त्रिधा ।।122।।
म्हणौनि , त्रिविधु आहारु , । यज्ञुही त्रिप्रकारु ।
तप , दान , हन , व्यापारु । त्रिविधचि ते ।।123।।
पै , आहार लक्षण पहिले । सांगो जें म्हणितले , ।
तें आईक गा ! भले । रूप करूं ।।124।।

**आयुः सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना ः ।**
**रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रिया ः ।।8।।**
**सात्त्विक पुरुषास आवडणारे आहार आयुष्य ,सात्त्विक वृत्ति, बल, आरोग्य, सुख आणि प्रीती हे वाढविणारे, रसयुक्त,स्निग्ध, शरीरात मुरून चिरकाल रहाणारे व मनाला आनंदायक असतात.**

तरी , सत्त्वगुणाकडे । जै दैवे भोक्ता पडे , ।
तै , मधुरी रसी वाढे  । मेचु [6] तया ।।125।। — 6 आवड
आंगेचि द्रव्ये सुरसे [7] , । जे आंगेचि पदार्थ गोडसे , । — 7 स्वभावतःच पदार्थ स्वादिष्ट
स्नेहे  बहुवसे । सुपक्वे जिये ।।126।।
आकारे नव्हती डगळे [8] , । स्पर्शे अति मवाळे [9] । — 8 मोठी 9 मऊ
जिभेलागी स्नेहाळे । स्वादे जिये ।।127।।
रसे गाढी [10] , वरी ढिली । द्रवभावी [11] आथिली । — 10 भरपूर 11 रसभावाने
ठाये ठावो सांडिली । अग्नीतापे ।।128।।
आंगे सांने परिणामे थोरु । जैसे, गुरुमखीचे अक्षरु ।
तैशी , अल्पी जिही , अपारु । तृप्ति राहे ।।129।।
आणि , मुखी जैसी गोडे , । तैसीचिहि ते आंतुलेकडे ।
तिये अन्नी , प्रीती वाढे । सात्त्विकासी ।।130।।
एवं , गुणलक्षण । सात्त्विक  भोज्य जाण ।
आयुष्याचे त्राण [12] । नीच [13] नवे हे ।।131।। — 12 बळ 13 नित्य

येणे सात्त्विक रसे । जंव देही मेहो [1] वरिषे , । — 1 मेघ
तंव , आयुष्यनदी उससे [2] । दिहाचि दिहा ।।132।। — 2 वाढते
सत्त्वाचिये कीर पाळती [3] । कारण हाचि सुमती ! । — 3 रक्षण करण्यास
दिवसाचिये उन्नती । भानु जैसा ।।133।।
आणि शरीरा हन मानसा । बळाचा पै , कुवासा [4] । — 4 आश्रय
हा आहारु , तरी दशा । कैची रोगां ? ।।134।।
हा सात्त्विकु होय भोग्यु । तैची भोगावया आरोग्यु ।
शरीरासी भाग्यु । उदयले जाणो ।।135।।
आणि , सुखाचे घेणे देणे , । निके उवाया [5] ये येणे । — 5 खात्रिपूर्वक उत्कर्षास येणे
हें असो ; वाढे साजणे [6] । आनंदेसी ।।136।। — 6 सख्य
ऐसा सात्त्विकु आहारु , । परिणमला थोरु , ।
करी हा उपकारु । सबाह्यासी ।।137।।
आतां राजसासि प्रती । जिही रसी आथी ।
करू तयाही व्यक्ती । प्रसंगे गा ! ।।138 ।।

**कटवम्ललवणात्युष्णतीक्ष्णरुक्षविदाहिनः ।**
**आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ।।9।।**
**राजस पुरुषाल ा प्रिय होणारे आहार कटु म्हणजे तिखट,आंबट,खारट,अति उष्ण,झणझणीत,रुक्ष, दाहकारक आणि दुःख,शोक व रोग उत्पन्न करणारे असतात.**

तरी , मारे उणे [7] काळकूट , । तेणेमाने जे कडुवट , । — 7 मारकपणाने कमी
कां , चुनियाहूनि दासट [8] । आम्ल हन ।।139।। — 8 दाहक
कणिकीते जैसे पाणी , । तैसेचि मीठ बांधया आणी ।
तेंतुलीच मेळवणी । रसांतरांची ।।140।।
ऐसे खारट अपाडे । राजसा तया आवडे ।
उन्हाचेनि मिषे , तोंडे । आगीचि गिळी ।।141।।
वाफेचिया सिगे [9] । वातीही लाविल्या लागे , । — 9 टोकवर 10 दगड
तैसे उन्ह मागे । राजसु तो ।।142।।
वावदळ[10] पाडूनि ठाये [11]। साबळु[12] डाहारला[13] आहे , । — 11फोडण्यासाठी 12 पहार
तैसे तीख तो खाये । जें , घायेविण [14] रुपी ।।143।। — 13धार असणे 14 जखमेशिवाय
आणि राखेहूनि कोरडे । आंत बाहेरी येके पाडे ।
तो जिव्हादंशु आवडे । बहु तया ।।144।।
परस्परे दांता । आदळु , होय खातां , ।
तो गा तोंडी घेतां । तोषो लागे ।।145।।
आधीच द्रव्ये चुरमुरी [15] । वरी परवडिजती [16] मोहरी । — 15 झणझणीत 16 मोहरीने माखावयाचे
जिये घेतां होती धुवारी । नाकेतोंडे ।।146।।

हें असो ; उगे आगीते । म्हणे तैसे राइते ।
पढिये प्राणापरौते । राजसासि गा ! ।।147।।
ऐसा , न पुरोनि तोंडा , । जिभा  केला वेडा ।
अन्नमिषे अग्नि भडभडां । पोटी भरी ।।148।।
तैसाचि लवंगा सुंठे । मग भुई ,  ना सेजे , खाटे ।
पाणियाचे न सुटे । तोंडोनि पात्र ।।149।।
तें आहार नव्हती घेतले , । व्याधिव्याळ जे सुतले [1] । 1 सुप्त होतें
तें चेववावया घातले । माजवण पोटी ।।150।।
तैसे एकमेका सळे [2] । रोग उठति एके वेळे । 2 स्पर्धा करित
ऐसा राजसु आहारु फळे । केवळ दुःखे ।।151।।
एवं ,राजसा आहारा । रूप केले धनुर्धरा ! ।
परिणामाचाही विसुरा [3] । सांगितला ।।152।। 3 विचार
आतां , तया तामसा । आवडे आहारु जैसा , ।
तेही सांगो , चिळसा [4] । झणे तुम्ही ।।153   ।। 4 कीळस

**यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ।**
**उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ।।10।।**

**तामस पुरुषास आवडणारे अन्न वेळ होऊन गेलेले म्हणजे निवालेले, निरस,दुर्गंधी, एक दिवसाचे शिळे झालेले, उष्टे आणि तसेच अपवित्र असते.**

तरी , कुहिले  [5] उष्टे खातां , । न मनिजे तेंणे अनहिता , । 5 कुजलेले
जैसे , कां , उपहिता  [6] । म्हैसी खाय ।।154।। 6 आंबोण
निपजले अन्न तैसे । दुपाहरी कां येरे दिवसे ।
अतिकरे  [7] , तै तामसे । घेईजे तें ।।155।। 7 खूप वेळाने
नातरी , अर्ध उकडिले , । कां , निपट करपोनि गेले ।
तैसेहि खाय , चुकले । रसा जे येवो ।।156।।
जया कां आथि पूर्ण निष्पत्ती , । जेथ रसु धरी व्यक्ती [8] । 8 स्पष्ट दिसतो
तें अन्न , ऐसे प्रतीती  [9] । तामसा नाही ।।157।। 9 समजत नाही
ऐसेनि कही विपाये , । सदन्ना वरपडा [10]  होये , । 10 प्राप्त झाले
तरी , घाणी सुटे तंव राहे , । व्याघ्रु जैसा ।।158।।
कां , बहुवे दिवशी वोलांडिले [11] । स्वादपणे सांडिले , । 11 खूप दिवस झालेले
शुष्क अथवा सडले , । गाभिणेही हो  [12] ।।159।। 12 आंबलेले का असेना
तेही , बाळाचे हातवरी । चिवडिले , जैसी राडी करी , ।
कां , सवे बैसोनि नारी । गोतांबील करी [13] ।।160।। 13 एकाच ताटात जेवतात

ऐसेनि,कश्मळे जै खाय,। तै,तया सुखभोजन ऐसे होय ।
परी , येणेही न धाय [1], । पापिया तो ।।161।। 1 समाधान होत नाही
मग चमत्कारु देखा ! । निषेधाचा आंबुखा [2] । 2 शिंतोडा
जया का सदोखा [3] । कुद्रव्यासी ।।162।। 3 दोषयुक्त
तया अपेयांच्या पानी , । अखाद्यांच्या भोजनी ।
वाढविजे उतान्ही [4] । तामसे तेणे ।।163।। 4 इच्छा
एवं , तामस जेवणारा । ऐसैसी मेचु [5] , हे वीरा ! । 5 आवड
तयाचे फल दुसरां । क्षणी नाही ।।164।।
जे , जेव्हांचि हे अपवित्र । शिवे तयाचे वक्त्र , ।
तेव्हांचि पापा पात्र । जाला तो की ! ।।165।।
यावरते जे जेवी , । ते जेविती वोज [6] न म्हणावी , । 6 जेवण्याची रीत न म्हणावी
पोटभरती जाणावी । यातना ते ।।166।।
शिरच्छेदे काय होये ? । कां , आगी रिघता कैसे आहे ? ।
हें जाणावे [7] काई पाहे ?। परी साहातुचि असे ।।167।। 7 प्रत्यक्ष अनुभव घ्यावा लागतो का?
म्हणौनि , तामसा अन्ना । परिणामु , गा ! सिनाना ।
न सांगोचि , गा अर्जुना ! । देवो म्हणे ।।168।।
आतां , ययावरी । आहाराचिया परी , ।
यज्ञुही अवधारी , । त्रिधा असे ।।169।।
तरी , तिहीमाजी प्रथम । सात्त्विक यज्ञाचे वर्म ।
आईक पां ! सुमहिम-। शिरोमणी [8] ।।170। । 8 चांगली कीर्ती असलेल्या

**अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।**
**यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विक ः ।।11।।**

**फलाशेची आकांक्षा न ठेविता यज्ञ करणे हे आपले कर्तव्य समजून शास्त्रविधीप्रमाणे शांत चित्ताने जो यज्ञ करितात तो सात्त्विक होय .**

तरी , एकु प्रियोत्तमु- । वांचोनि , वाढो नेदी कामु , ।
जैसा का मनोधर्मु । पतिव्रतेचा , ।।171।।
नाना , सिंधूतें ठाकोनि [9] , गंगा । पुढारा न करीचि रिगा [10] । 9 पोचून 10 पुढे शिरत नाही
का , आत्मा देखोनि उगा , । वेदु ठेला ।।172।।
तैसे , जे आपुल्या स्वहिती । वेचूनिया चित्तवृत्ती , ।
नुरवितीचि अहंकृती । फळालागी , ।।173।।
पातलेया झाडाचे मुळ , । मागुतें सरो , नेणेचि जळ , ।
जिराले कां केवळ । तयाच्याचि आंगी , ।।174।।

तैसे, मने , देही , । यजननिश्चयाच्या ठायी ।
हारपोनि , जे काही । वांछितीना , ।।175।।
तिही फळवांच्छात्यागी , । स्वधर्मावांचूनि विरागी [1] ।
कीजे , तो यज्ञु सर्वांगी । अळंकृतु ।।176।।
परी , आरिसा , आपणपे । डोळां जैसे घेपे [2] , ।
कां , तळहातीचे , दीपे । रत्न पाहिजे , ।।177।।
नाना , उदितें दिवाकरे , । गमावा [3] मार्गु , दिठी भरे [4] ।
तैसा , वेदु निर्धारे [5] । देखोनिया , ।।178।। ।
तिये कुंडे , मंडप , वेदी । आणीकही संभारसमृद्धी [6] ।
तें मेळवणे , जैसी विधी । आपणपां केली [7] , ।।179।।
सकळावयव उचिते । लेणी , पातली जैसी आंगाते , ।
तैसे पदार्थ जेथिचे तेंथे । विनियोगुनी , ।।180।।
काय वानूं ! बहुती बोली ! । जैसी , सर्वाभरणी भरली ।
तें , यज्ञविद्याचि रूपा आली । यजनमिषे ।।181।।
तैसा सांगोपांगु , । निफजे जो यागु , ।
नुठऊनिया लागु [8] । महत्त्वाचा , ।।182।।
प्रतिपाळु तरी पाटाचा [9] । झाडी ,कीजे , तुळसीचा , ।
परी , फळा , फुला , छायेचा । आश्रयो नाही ।।183।।
किंबहुना , फळाशेवीण , । ऐसेया निगुती निर्माण ।
होय , तो यागु जाण । सात्त्विकु गा ! ।।184।।

1 वैराग्यशील
2 स्वतःला डोळ्याने पाहातो
3 जाण्याचा 4 दृष्टिस पडतो
5 वेदांच्या विचाराप्रमाणे
6 यज्ञाची सामुग्री
7 जणु काय वेदांनि स्वतःच केली
8 आशा
9 मनपूर्वक

**अभिसंधाय तु फलं दंभार्थमपि चैव यत् ।**
**इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ।।12।।**

**पण फलाची इच्छा ठेवून किंवा दंभार्थ म्हणजे ऐश्वर्य प्रदर्शनार्थहि जो यज्ञ करितात तो यज्ञ हे भरत श्रेष्ठा ! राजस असे समज**

आतां , यज्ञु कीर , वीरेशा ! । करी , पै याचि ऐसा ।
परी , श्राद्धालागी जैसा , । अवंतिला रावो ।।+185।।
जरी राजा घरासि ये , । तरी बहुत उपेगा जाये , ।
आणि , कीर्तीही होये । श्राद्ध न ठके [10] ।।186।।
तैसा धरूनि आवांका [11] ,। म्हणे,'' स्वर्गु जोडेल असिका [12] ,।
दीक्षितु होईन [13], मान्यु लोका , । घडेल यागु ।।187।।
ऐसी केवळ फळालागी , । महत्त्व फोकारावया [14] जगी , ।
पार्था ! निष्पत्ति जे यागी , । राजस पै ते ।।188।।

10 कमतरता राहणार नाही
11 हेतु 12 आयता
13 यज्ञ करणारा म्हणून
14 गवगवा करण्याकरिता

**विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम् ।**
**श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ।।13।।**
**शास्त्रविधी सोडून , अन्नसंतर्पणाशिवाय , मंत्रावांचून , दक्षिणा न देतां आणि श्रद्धा नसतां केलेला जो यज्ञ त्याला तामस म्हणतात.**

आणि , पशुपक्षिविवाही , । जोशी कामापरौता नाही [1] । — 1 कामा वाचून दुसरा भटजी नाही
तैसा , तामसा यज्ञा पाही । आग्रहोचि मूळ ।।189।।
वारया वाट न वाहे [2] , । की , मरण मुहूर्त पाहे , । — 2 मोकळा मार्ग लागत नाही
निषिद्धांसि बिहे [3]। आगी जरी , ।।190।। — 3 अमंगळ वस्तुला भीतें
तरी,तामसाचिया आचारा,। विधीचा आथी वोढावारा [4],। — 4 धरबंध नसतो
म्हणौनि , तो धनुर्धरा ! । उत्सृंखळु ।।191।।
नाही विधीची तेथ चाड , । नये मंत्रादिक तयाकड । — 5 दिसले अन्न की माशी जशी त्यात तोंड घालते
अन्नजातां न सुये तोंड [5] । मासिये जेवी ! ।।192।।
वैराचा बोधु ब्राह्मणा [6], । तेथ के रिगेल दक्षिणा ? । — 6 ब्राह्मणाचा द्वेष करणे एवढेच ज्ञान 7 वावटळ 8 मदत
अग्नि जाला वाउधाणा [7] । वरपडा [8] जैसा ।।193।।
तैसे , वायांचि सर्वस्व वेचे । मुख न देखती श्रद्धेचे ।
नागविले निपुत्रिकाचे । जैसे घर ।।194।।
ऐसा जो यज्ञाभासु , । तया नाम यागु तामसु ।
आइके म्हणे निवासु । श्रियेचा तो ।।195।।
आतां , गंगेचे एक पाणी , । परी नेले आनानी वाहणी [9] । — 9 वेगवेगळ्या मार्गाने
एक मळी , एक आणी । शुद्धत्व जैसे ।।196।।
तैसे , तिही गुणी तप । येथे जाहले आहे त्रिरूप , ।
तें एक केले दे पाप , । उद्धरी एक ।।197।।
तरी तेचि तिही भेदी । कैसेनि पां ! म्हणौनि सुबुद्धी ।
जाणो पाहासी , तरी आधी । तपचि जाण ।।198।।
येथ तप म्हणजे काई , । ते स्वरूप दाऊं पाही ।
मग भेदिले गुणी तिही । तें पाठी बोलो ।।199।।
तरी तप जे कां सम्यक् [10] , । तेही त्रिविध , आइक । — 10 उत्तम
शारीर , मानसिक , । शाब्द गा ! ।।200।।

**देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।**
**ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ।।14।।**
**देव, ब्राह्मण,गुरु व विद्वान यांचे पूजन, शुचिर्भूतपणा, सरळपणा, ब्रह्मचर्य व अहिंसा यांस शारीर म्हणजे कायिक तप म्हणतात.**

आतां , या तिही माझारी । शारीर तंव अवधारी ।
तरी , शंभू कां श्रीहरी , । पढियंता [1] होय ।।201।। 1 आवडता
तया प्रिय देवतालया । यात्रादिके करावया ।
आठही पाहार जैसे पायां । उळिग घापे [2] ।।202।। 2 भोवरा असतो
देवांगणमिरवणियां [3] , । अंगोपचार पुरवणिया [4] , । 3 देव सजवण्यास
करावया म्हणिया [5] । शोभती हात ।।203।। 4 गंधपुष्पादिक 5 जणुकाय त्याच
लिंग कां प्रतिमा दिठी । देखतखेवों , अंगेष्टी [6] । करिता 6 शरीर
लोटिजे , कां काठी । पडली जैसी ।।204।।
आणि विधिविनयादिकी [7] । गुणी,वडील जें लोकीं,। 7 विधिवत आचरण करणारे
तया ब्राह्मणाची निकी [8] । पाइकी [9] कीजे ।।205।। 8 चांगली 9 सेवा
अथवा,प्रवासे कां पीडा,। का,शिणले जे सांकडां[10] । 10 संकटांनी
तें जीव सुरवाडा [11] । आणिजती ।।206।। 11 सुखी अवस्थेला
सकल तीर्थांचिये धुरे । जिये का मातापितरे , ।
तयां सेवेसि कीर शरीरे । लोण कीजे ।।207।।
आणि,संसाराऐसा दारुणु । जो भेटलाचि,हरी शीणु ,।
तो ज्ञानदानी , सकरुणु । भजिजे गुरु ।।208।। 12 अग्नी 13 मळ
आणि,स्वधर्माचा आगिठा [12]।देह जाड्याचिया किटा [13]। 14 अभ्यासयोगरुपी पुटाने
आवृत्तिपुटी [14] , सुभटा ! । झाडी कीजे [15] ।।209।। 15 शुद्ध करणे
वस्तु भूतमात्री [16],नमिजे,। परोपकारी भजिजे , । 16 भूतमात्रांत ब्रह्म आहे
स्त्रीविषयी नियमिजे । नांवेनांवे [17] ।।210।। या भावनेने 17 वेळोवेळी
जन्मतेनि प्रसंगे , । स्त्रीदेह शिवणे आंगे । संयम बाळगणे
तेथूनि , जन्म आघवे । सोवळे कीजे [18] ।।211।। 18 स्पर्श न करणे
भूतमात्राचेनि नांवे । तृणही नासुडावे [19] । 19 त्रास देत नाही
किंबहुना , सांडावे । छेद , भेद ।।212।।
ऐसैसी जै शरीरी । रहाटीची पडे उजरी [20] , । 20 उत्कर्ष
तै , शारीर तप घुमरी [21] । आलें जाण ।।213।। 21 भरास
पार्था ! समस्तही हे करणे । देहाचेनि प्रधानपणे , ।
म्हणौनि , ययाते मी म्हणे , । '' शारीर तप '' ।।214।।
एवं , शारीर जे तप , । तयाचे दाविले रूप , ।
आतां , आइक निष्पाप ! । वाङमय ते ।।215।।

**अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।**
**स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङमयं तप उच्यते ।।15।।**

**मनाला उद्वेग न देणारे, सत्य,प्रिय व हितकार असे जे भाषण ते, आणि स्वाध्यायाचा म्हणजे स्वकर्माचा अभ्यास, यास वाङमय (वाचिक ) तप म्हणतात**

| | |
|---|---|
| तरी लोहाचे आंग , तुक [1] । न तोडितांचि , कनके । | 1 आकार व वजन |
| केले जैसे , देख । परिसे तेणे ।।216।। | |
| तैसे न दुखवितां , सेजे । जावळिया [2] , सुख निपजे , । | 2 विश्रांतीचे भावंडच जणु काय |
| ऐसे साधुत्व कां देखिजे , । बोलणा [3] जिये , ।।217 ।। | 3 बोलण्यात |
| **पाणी मुदल [4] झाडा जाये , । तृण ते प्रसंगेचि [5] जिये ।** | 4 मूळतः 5 अनुषंगाने |
| **तैसे एका बोलिले , होये । सर्वांहि हित ।। 218।।** | |
| जोडे अमृताची सुरसरी [6] । तै प्राणांतें अमर करी , । | 6 गंगा |
| स्नाने पाप , ताप , वारी । गोडीही दे ।।219।। | |
| तैसा , अविवेकुही फिटे , । आपुले अनादित्व [7] भेटे । | 7 मूळ स्वरूप |
| आइकतां , रुचि न विटे । पीयुषी [8] जैसी ।।220।। | 8 अमृत |
| जरी कोणी करी पुसणे , । तरी होआवे ऐसे बोलणे , । | |
| नातरी आवर्तणे [9]।निगमु[10] का नाम (निगमाचळी) ।।221।। | 9 वारंवार म्हणणे 10 वेद |
| ऋग्वेदादि तिन्ही , । प्रतिष्ठीजती [11] वाग्भुवनी । | 11 प्रतिष्ठापना केली आहें |
| केली जैसी वदनी । ब्रह्मशाळा ।।222।। | |
| नातरी एकाधे नांव , । तेचि शैव का वैष्णव , । | |
| वाचे वसे , ते वाग्भव । तप जाणावे ।।223।। | |
| आतां तप जे मानसिक , । तेही सांगो आइक । | |
| म्हणे लोकनाथनायक । नायकु तो ।।224।। | |

**मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।**
**भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ।।16।।**

**मन प्रसन्न ठेवणे, सौम्यता, मोन म्हणजे मुनीप्रमाणे वृत्ति असणे ,मनोनिग्रह आणि शुद्ध भावना यांस मानस तप म्हणतात.**

| | |
|---|---|
| तरी सरोवर , तरंगी । सांडिले , आकाश मेघी , । | |
| कां , चंदनाचे उरगी [12] । उद्यान जैसे ।।225।। | 12 साप |
| नाना,कळवैषम्ये [13] चंद्रु ।कां,सांडिला आधी [14] नरेंद्रु । | 13 कमीजास्त कलांनी |
| नातरी , क्षीर समुद्रु । मंदराचळे ।।226।। | 14 मनस्तापाने |
| तैसी , नाना विकल्पजाळे । सांडूनि गेलिया सकळे , । | |
| मन राहे कां केवळे । स्वरुपे जे ।।227।। | |
| तपनेवीण प्रकाशु , । जाड्येवीण [15] रसी रसु , । | 15 जडपणा |
| पोकळीवीण अवकाशु । होय जैसा ।।228।। | |
| तैसी,आपली सोय [16] देखे,। आणि,आपलिया स्वभावा मुके । | 16 विश्रांतीस्थान |
| हिवली[17] जैसी,आंगिके [18] । हिवो नेदी निजांग[19] ।।229।। | 17 थंडी 18 स्वभावतः 19 स्वतःला बोचत नाही |

न चलते[1] कळंकेवीण । शशिबिंब जैसे परिपूर्ण । 1 अचल
तैसे चोखी [2] शृंगारपण । मनाचे जे ।।230।। 2 शुद्ध
बुजाली वैराग्याची वोरप[3] , । जिराली मनाची धांपकांप , । 3 कुतरओढ
तेंथ केवळ जाली वाफ[4] । निजबोधाची[5] ।।231।। 4 कंपने 5 आत्मज्ञानाची
म्हणौनि , विचारावया शास्त्र , । राहाटवावे [6] जे वक्त्र , । 6 वापरावे
तें वाचेचेही सूत्र । हाती न धरी ।।232।।
तें स्वलाभ लाभलेपणे , । मन मनपणाही धरूं नेणे , ।
शिवतले [7] जैसे लवणे । आपुले निज [8]।।233।। 7 स्पर्श करणे 8 पाणी
तेंथ के उठिती तें भाव ? । जिही इंद्रियमार्गी धांव ।
घेऊनि , ठाकावे गांव । विषयांचे ते ।।234।।
म्हणौनि , तिये मानसी , । भावशुद्धिचि असे अपैसी , ।
रोमशुचि जैसी । तळहातासी ।।235।।
काय बहु बोलो अर्जुना ! । जै हें दशा ये मना , ।
तै , मनोतपाभिधाना [9] । पात्र होय ती ।।236।। 9 मानस तप या संज्ञेला
परी ते असो, हे जाण । मानस तपाचे लक्षण ।
देवो म्हणे संपूर्ण । सांगितले ।।337।।
एवं , देहवाचाचित्ते । जे पातले त्रिविधत्वाते , ।
तें सामान्य तप तूंतें । परिसविले गा ! ।।238।।
आतां , गुणत्रयसंगे । हेचि विशेषी त्रिविध रिगे , ।
तेही आइक चांगे । प्रज्ञाबळे [10] ।।239।। 10 बुद्धीच्या बळाने

**श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः ।**
**अफलाकाङक्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ।।17।।**
**हें तीनही प्रकारचे तप फलाची आकांक्षा न ठेविता उत्कृष्ठ श्रद्धेने व योगुक्त बुद्धीने मनुष्यांनी केले म्हणजे त्यास सात्त्विक म्हणतात.**

तरी , हेचि तप त्रिविधा । जे दाविले तुज प्रबुद्धा , ।
तेचि करी पूर्णश्रद्धा , । सांडूनि फळ ।।240।।
जै,पुरतिया सत्त्वशुद्धी[11] ,।आचरिजे आस्तिक्यबुद्धी [12] । 11 पूर्ण सत्त्वशुद्धी चे हेंतुने
तै , तयातेचि गा प्रबुद्धी । सात्त्विक म्हणिपे ।।241।। 12 ईश्वरनिष्ठेने

**सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् ।**
**क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमधृवम् ।।18।।**
**आणि आपला सत्कार, मान किंवा पूजा व्हावी म्हणून अथवा दंभाने जे तप करितात तेव्हां त्या चल व अस्थिर तपास येथे म्हणजे शास्त्रात राजस तप म्हंटले आहें .**

नातरी,तपस्थापनेलागी,।दुजेंपण मांडूनि [1] जगी,। — 1 भेदभाव निर्माण करून
महत्त्वाच्या शृंगी [2] , । बैसावया , ।।242।। — 2 मान्यतेच्या पदावर
त्रिभुवनीचिया सन्माना , । न वचावे ठाया आना , ।
धुरेचिया [3] आसना , । भोजनालागी ।।243।। — 3 पहिल्या
विश्वाचिया स्त्रोत्रा , । आपण होआवया पात्रा , ।
विश्वे , आपलिया यात्रा । कराविया यावे , ।।244।।
लोकांचिया विविधा पूजा । आश्रयो न धरावया दुजा , ।
भोग भोगावे वोजा [4] । महत्त्वाचिया , ।।245।। — 4 योग्यतेचे
अंग , बोल , माखूनि तपे , । विकावया आपणपें ।
अंगहीन पडपे [5] । जियापरी ।।246।। — 5 वैश्या शृंगार करते
हें असो; धनमानी आस । वाढउनि,तप कीजे सायास,।
तै , तेचि तप राजस । बोलिजे गा ! ।।247।। — 6 दूध शोषणाऱ्या एका कीड्याने दूध शोषले
परी,पहुरणी जे दुहिले [6] ,।तै,ते गुरु न दुभेचि [7], व्याले [8], । — 7 दूध देत नाही
का , उभे शेत चारिले , । पिकावया नुरे ।।248।।
तैसे , फोकारितां तप , । कीजे जे साक्षेप [9] । — 8 व्यायले तरी 9 कष्ट करून
तें फळी तंव सोप [10] । निःशेष जाय ।।249।। — 10 व्यर्थ
ऐसे,निर्फळ देखोनि,करितां । माझारी सांडी, पंडुसुतां ! ।
म्हणौनि , नाही स्थिरता । तपा तया ।।250।।
एऱ्हवी तरी,आकाश मांडी [11] । जो गर्जोनि ब्रह्मांड फोडी , । — 11 व्यापतो
तो अवकाळु मेघु , काय घडी । राहत आहे ? ।।251।।
तैसे , राजस तप जे होये , । ते फळी कीर वांझ जाये , ।
परी आचरणीही नोहे । निर्वाहते [12] गा ! ।।252।। — 12 टिकण्याजोगे
आतां , तेचि तप पुढती । तामसाचिया रीती ।
पै , परत्रा आणि कीर्ती । मुकोनि कीजे ।।253।।

**मूढग्राहेणात्मनो यत् पीडया क्रियते तपः ।**
**परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ।।19।।**

**वेड्या आग्रहाने, आपल्याला पीडा करणारे, किंवा जारणमारणादि कर्मानी लोकांना नाडण्यासाठी जे तप करितात त्याला तामस म्हणतात.**

केवळ मूर्खपणाचा वारा । जीवी घेऊनि , धनुर्धरा ! ।
नाम ठेविजे शरीरा । वैरियाचे ।।254।।
पंचाग्नीची दडगी (हडगी)[13]।खोलवीजती [14] शरीरालागी । — 14 भट्टी 15 लावितात
कां , इंधन कीजे [16] हे आगी । आंतु लावी ।।255।। — 16 शरीर इंधनाप्रमाणे जळावे

माथां जाळिजती गुगुळु , । पाठी घालिजती गळु , ।
आंग जाळिती इंगळु [1] । जळतभीतां [2] ।।256।। 1 निखारा 2 ज्वाळा निघणाऱ्या
दवडोनि श्वासोच्छ्वास , । कीजती वायांचि उपवास , ।
कां , घेपती धूमाचे घांस । अधोमुखे ।।257।।
हिमोदके आकंठे । खडके सेविजती तटे [3] , । 3 खडकाळ नदीच्या तटाचा आश्रय करितात
जितया मांसाचे चिमुटे । तोडिती जेथ ।।258।।
ऐसी नानापरी , हे काया । घाय सूतां [4] , पै , धनंजया ! । 4 घाव घालून
तप कीजें नाशावया । पुढिलाते ।।259।।
आंगभारे सुटला धोंडा , । आपण फुटोनि होय खंडखंडा , ।
कां , आड जालियाते रगडा । करी जैसा ।।260।।
तेवी , आपलिया आटणिया , । सुखे असतया प्राणिया ।
जिणावया शिराणिया [5] । कीजती गा ! ।।261।। 5 जिंकण्याच्या आशेने
किंबहुना , हे वोखटी [6] । घेऊनि क्लेशाची हातवटी [7] । 6 वाईट 7 रीतीने
तप जे निफजे , ते किरीटी ! । तामस होय ।।262।।
एवं , सत्त्वादिकांच्या आंगी । पडिले , तप तिही भागी ।
जाले , तेही तुज चांगी । दाविले व्यक्ती [8] ।।263।। 8 स्पष्ट करून
आतां , बोलतां प्रसंगा । आले , म्हणौनि , पै , गा ! ।
करूं रूप दानलिंगा । त्रिविधा तया ।।264।।
येथ गुणाचेनि बोले , । दानही त्रिविध असे जाले ।
तेचि आइक पहिले । सात्त्विक ऐसे ।।265।।

**दातव्यमिति यद्दानं दीयते ऽनुपकारिणे ।**
**देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् ।।20।।**
**दान करणे आपले कर्तव्य आहे अशा बुद्धीने , योग्य स्थल,काल व पात्र याचा विचार पाहून आपल्यावर उपकार न करणाऱ्यास जे दान देतात ते सात्त्विक म्हटले आहे .**

तरी स्वधर्मा आंतौतें [9],। जे, जे,मिळेल आपणयाते,। 9 अधीन राहून
तें , ते , दीजे , बहुते । सन्मानयोगे ।।266।।
जालया सुबीजप्रसंगु , । पडे क्षेत्रवाफेचा पांगु [10] । 10 वाफऱ्याची उणीव
तैसाचि दानाचा हा लागु [11] । देखतसे ।।267।। 11 प्रसंग
अनर्घ्य रत्न हातां चढे , । तै, भांगाराची वोढी [12] पडे । 12 सोन्याची कमतरता
दोनी जाली , तरी न जोडे । लेतें आंग ।।268।।
परी , सण , सुहृद ,संपत्ती , । हे तिन्ही येकी मिळती , ।
जै , भाग्य धरी उन्नती । आपुल्याविषयी ।।269।।

तैसे , निफजावया दान , । जै सत्त्वासि ये संवाहन [1] ।   1 मदत
तै , देश , काळ ,भाजन [2] । द्रव्यही मिळे ।।270।।   2. सत्पात्र
तरी , आधी तंव प्रयत्नेसी । होआवे कुरुक्षेत्र का काशी , ।
नातरी , तुके जो इहीसी , । तो देशुही हो ।।271।।
तेंथ रविचंद्रराहुमेळु । होता , पाहे पुण्यकाळु ।
कां , तयासारिखा निर्मळु । आनुही जाला ।।272।।
तैशा काळी , तिये देशी । होआवी पात्र संपत्ती ऐसी , ।
मूर्ती आहे धरिली जैसी । शुचित्वेचि कां ।।273।।
आचाराचे मूळपीठ , । वेदांची उतारपेठ [3] ।   3 घाट
तैसे द्विजरत्न चोखट । पावोनियां ।।274।।
मग तयाच्या ठाई वित्ता । निवर्तवावी स्वसत्ता ।
परी प्रियापुढे कांता । रिगे जैसी ।।275।।
का , जयाचे ठेविले तया । देऊनि , होईजें उतराइया ।
नाना , हडपे [4] विडा राया । दिधला जैसा ।।276।।   4 विडा देणारा
तैसेनि निष्कामे जीवे । भूम्यादिक अर्पावे ।
किंबहुना हांवे [5] । नेदावे उठो ।।277।।   5 फलाशा
आणि दान जया द्यावे , । तयाते ऐसेया पाहावे ।
जया घेतले , नुमचवे [6] । कायसेनही ।।278।।   6 परत फेडु शकणार नाही
साद घातलिया आकाशा , । नेदी प्रतिशब्दु जैसा , ।
का , पाहिला आरसा । येरीकडे [7] ।।279।।   7 पाठीमागून
नातरी , उदकाचिये भूमिके , । आफळिलेनि कंदुके [8] ।   8 चेंडु आपटला असता
उधळौनि कवतिके । न येईजे हाता ।।280।।
नाना , वसो [9] घातला चारु । माथां तुरंबिला [10] बुरु [11] , ।   9 पोळ 10 मान दिला
न करी प्रत्युपकारु । जियापरी ।।281।।   11 कृतघ्न माणुस
तैसे , दिधले दातयाचे । जो कोणेही आंगे नुमचे [12] ।   12 परतफेड करतो
अर्पिलया साम्य [13] तयाचे । कींजे , पै , गा ! ।।282।।   13 सारखेपणा
ऐसिया जे सामग्रिया , । दान निपजे , वीरराया ! ।
तें सात्त्विक दानवर्या । सर्वाही जाण ।।283।।
आणि , तोचि देशु , काळु , । घडे तेसाचि पात्रमेळु , ।
दानभागुही निर्मळु । न्यायगतु [14] ।।284।।   14 शास्त्रास अनुसरुन

**यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ।**
**दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ।।21।।**

**परंतु केलेल्या उपकाराचा मोबदला म्हणून, किंवा पुढे काही फलाची आशा ठेवून संकटाने जें दान देतात ते राजस म्हटले आहें**

| | |
|---|---|
| परी , मनी धरूनि दुभते , । चारिजे जेवी गाईते , । | |
| का , पेव [1] करुनि आइते , । पेरूं जाइजे ।।285।। | 1 धान्याची कोठी करून |
| नाना , दिठी घालूनि आहेरा , । अवंतुं जाइजे सोयिरा , । | |
| वाण धाडिजे घरा , । वोवसीयाचे [2] ।।286।। | 2 व्रतस्थाच्या |
| पै,कळांतर [3] गांठी बांधिजे,।मग पुढिलांचे काज कीजे ,। | 3 व्याज |
| पूजा घेऊनि रसु दीजे । पीडितांसी ।।287।। | |
| तैसे , जया जे दान देणे , । तो तेंणेचि गा जीवने [4] । | 4 आश्रयाने (ओझ्यामुळे) |
| पुढती भुंजावा [5] , भावे येणे । दीजें जे का , ।।288।। | 5 प्रशंसावे |
| अथवा,कोणी वाटे जातां,। घेतले उमचो [6] न शकतां,। | 6 परत करेल |
| मिळे जै पंडुसुता ! । द्विजोत्तमु ।।289।। | |
| तरी कवड्या एकासाठी , । अशेषां गोत्रांचीच किरीटी ! । | |
| सर्व प्रायश्चित्ते सुये मुठी । तयाचिये ।।290।। | |
| तेवीचि पारलौकिके । फळे वांछिजती अनेके । | |
| आणि दीजे , तरी भुके । येकाही नोहे ! ।।291।। | |
| तेही ब्राह्मणु नेवो सरे [7],। की हाणिचेनि [8] शिणे, झांसुरे [9] । | 7 स्वीकारले 8 नुकसानीने |
| सर्वस्व जैसे चोरे । नागऊनि नेले ।।292।। | 9 झुरतो |
| बहु काय सांगो सुमती ! । जे दीजें या मनोवृत्ती , । | |
| तें दान गा त्रिजगती । राजस पै ।।293।। | |

**अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ।**
**असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ।।22।।**

**अयोग्य स्थली, अकाली आणि अपात्री सत्काररहित अगर अवहेलनापूर्वक जे दान देतात ते तामस होय.**

| | |
|---|---|
| मग म्लेंच्छांचे वसौटे [10] ।दांगाणे [11] , हन कैकटे [12] । | 10 यवनवस्ती 11अरण्य |
| कां , शिबिरे ,चोहटे । नगरीचे ते ।।294।। | 12 अपवित्र स्थान |
| तेही ठाई , मिळणी । समयो सांजवेळु कां रजनी , । | |
| तेव्हां उदार होणे , धनी । चोरियेच्या ।।295।। | |
| पात्रे,भाट,नागारी [13] ,।सामान्य स्त्रिया [14],कां जुवारी , । | 13 गारुडी 14 वैश्या |
| जिये मुर्तिमंतें भुररी [15] । भुले तया ।।296।। | 15 मूर्तिमंत भूल पाडणारे |
| रूपनृत्याची पुरवणी , । ते पुढां डोळेभारणी [16] । | 16 डोळ्याला भुलवणारी |
| गीतभाटीव [17] तो श्रवणी । कर्णजपु ।।297।। | 17 भाटाची स्तुती |
| तयाहीवरी , अळुमाळु , । जै , घे फुलागंधाचा गुगुळु [18] । | 18 उन्मादकारक गंधाचा |
| तंव , भ्रमाचा तो वेताळु । अवतरे तैसा ।।298।। | वास |

तेंथ , विभांडूनियां जग , । आणिले पदार्थ अनेग ।
तेंणे घालूं लागे , मातंग [1] । गवादी [2] जैसी ।।299।।
एवं , ऐसेनि जे देणे , । ते तामस दान मी म्हणे ।
आणि , घडे दैवगुणे । आणिकही ऐक ।।300।।
विपाये , घुणाक्षर [3] पडे , । टाळिये काउळा सांपडे , ।
तैसे , तामसां पर्व जोडे , । पुण्यदेशी ।।301।।
तेंथ , देखोनि तो आथिला [4] , । योग्यु मागोही आला , ।
तोही दर्पा चढला । भांबावे [5] जरी ।।302 ।।
तरी , श्रद्धा न धरी जीवी , । तया माथाही न खालवी , ।
स्वये न करी , ना करवी , । अर्ध्यादिक ।।303।।
आलिया न घली बैसो , । तेथ गंधाक्षतांचा काय अतिसो ! ।
हा अप्रसंगु कीर असो । तामसी नरी ।।304।।
पै , बोळविजे [6] रिणाइतु [7] । तैसा झकवी [8] तयाचा हातु , ।
'' तूं '' करणे याचा बहुतु । प्रयोगु तेंथ ।।305।।
आणि , जया दे किरीटी ! । तयाते उमाणे [9] तयासाठी ।
मग कुबोले कां लोटी । अवज्ञेच्या ।।306।।
हें बहु असो ; यापरी । मोल वेचणे जे , अवधारी ।
तया नांव चराचरी । तामस दान ।।307।।
ऐसे आपुलाला चिन्ही , । अळंकृते तिन्ही ।
दाने दाविली , अभिधानी [10] । रजतमाचिया ।।308।।
तेंथ मी जाणत असे , । विपाये तूं गा ऐसे ।
कल्पिसील मानसे । विचक्षणा ! ।।309।।
जे भवबंधमोचक । येकले कर्म सात्त्विक , ।
तरी , कां वेखांसी [11] , सदोख । येर बोलावी ! ।।310।।
परी , नोसंतितां [12] विवसी [13] , । भेटी नाही निधीसी , ।
कां , धूं न साहतां , जैसी । वाती न लगे ।।311।।
तैसे , शुद्धसत्त्वाआड । आहे रजतमाचे कवाड , ।
तें भेदणे , याते कीड । म्हणावे कां ? ।।312।।
आम्ही श्रद्धादि दानांत , । जे समस्तही क्रियाजात ।
सांगितले कां व्याप्त । तिही गुणी , ।।313।।
तेथ , भरंवसेनि , तिन्ही । न सांगोचि ऐसे मानी , ।
परी , सत्त्व दावावया , दोन्ही । बोलिलो येरे ।।314।।
जे , दोहीमाजी तिजे असे , । ते दोन्ही सांडितांचि दिसे ।
अहोरात्रत्यागे जैसे । संध्यारूप ।।315।।

1 मांग 2 अन्नछत्र
3 लाकुड पोखरणाऱ्या किड्याकडून चकुन अक्षर कोरले जाते 4 संपन्न
5 गोंधळला
6 घालवतो 7 सावकार
8 झटकून टाकतो
9 बजावतो
10 नांवे
11 विरुद्ध
12 निवारण केल्याशिवाय
13 समंधाचे

तैसे , रजतमविनाशे , । तिजे जे उत्तम दिसे , ।
तें सत्त्व , हे आपैसे । फावासि ये [1] ।।316।। 1 प्राप्त होतें
एवं , दाखवावया सत्त्व तुज , । निरूपिले तम ,रज ।
तें सांडुनि , सत्त्वे , काज । साधी आपुले ।।317।।
सत्त्वेचि येणे चोखाळे । करी यज्ञादिके सकळे , ।
पावसी तै करतळे । आपुले निज [2] ।।318।। 2 स्वस्वरूप
सूर्ये दाविले सांतें[3] । काय एक न दिसे तेथे ? । 3 दाखविले असता
तेवी , सत्त्वे केले , फळाते । काय नेदी ?।।319।।
हें कीर आवडतांविखी [4] । शक्ति सत्त्वी आथी निकी , । 4 पाहिजे त्या विषयी
परी , मोक्षेसी एकी । मिसळणे जे , ।।320।।
तें एक आनचि आहे। तयाचा सावावो [5] जै लाहे , । 5 मदत
तै , मोक्षाचाही होये । गावी , सरते [6] ।।321।। 6 प्रवेश होतो
पै , भांगार जऱ्ही पंधरे [7] , । तऱ्ही राजावळीची [8] अक्षरे । 7 शुद्ध सोने असले तरी
लाहे , तैचि सरे [9] , । जियापरी ।।322।। 8 राजमुद्रेची 9 चालते
स्वेच्छे [10] , शीतळे , सुगंधे , । जळे , होती सुखप्रदे , । 10 स्वभावतः
परी पवित्रत्व , संबंधे । तीर्थाचेनि ।।323।।
नदी हो कां भलतैसी थोरी , । परी गंगा जै अंगिकारी , ।
तैचि तिये सागरी । प्रवेशु गा ! ।।324।।
तैसे सात्त्विका कर्मा , किरीटी ! । येतां मोक्षाचिये भेटी , ।
न पडे आडकाठी , । ते , वेगळे आहे ।।325।।
हा बोलु आइकतखेवी,। अर्जुना आधि [11] न माये जीवी । 11 उत्कंठा
म्हणे , '' देवे कृपा करावी । सांगावे ते ' ' ।।326।।
तेंथ,कृपाळुचक्रवर्ती। म्हणे ,'' आइक तयाची व्यक्ती [12] ,। 12 विवेचन
जेणे सात्त्विक ते मुक्ती-।रत्न देखे ।।327।।

**ॐतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।**
**ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ।।23।।**

**परब्रह्माचा " ॐ तत्सत् " असा तीन प्रकारे शास्त्रात निर्देश केला जातो. याच निर्देशाने पूर्वी ब्राह्मण, वेद व यज्ञ निर्माण केलेले आहेत.**

तरी , अनादि परब्रह्म , । जे जगदादि विश्रामधाम , ।
तयाचे एक नाम । त्रिधा , पै , असे ।।328।।
तें कीर अनाम, अजाती [13] । परी, अविद्यावर्गाचिये राती-। 13 जातरहित
माजी वोळखावया , श्रुती । खूण केली ।।329।।

उपजलिया बाळकासी , । नांव नाही तयापासी , ।
ठेविलेनि नांवेसी । ओ देत उठी ।।330।।
कष्टले संसारशिणे । जें देवो येती गाऱ्हाणे , ।
तयां ओ दे नांवे जेणे , । तो संकेतु [1] हा ।।331।। 1 खूण
ब्रह्माचा अबोला फिटावा,। अद्वैतत्त्वे (द्वैतत्वे ) तो भेटावा,।
ऐसा मंत्रु देखिला , कणवा [2] , । वेदे बापे ! ।।+332।। 2 कणव येऊन
मग दाविलेनि जेणे एके । ब्रह्म आळविले कवतिके , ।
मागां असत , ठाके । पुढां उभे ।।333।। 3 वेदाध्यान पारंगत
परी , निगमाचळशिखरी [3] , । उपनिषदार्थनगरी [4] , । 4 उपनिषदे जाणणारे
आहाति जे ब्रह्माच्या येकाहारी [5] , । तयांसीच कळे ।।334।। 5 ब्रह्माच्या योग्यतेचे
हेही असो ; प्रजापती । शक्ति जे सृष्टि करिती , ।
तें जया एका आवृत्ती । नामाचिये ।।335।।
पै , सृष्टीचिया उपक्रमा-।पूर्वी गा वीरोत्तमा ! ।
वेडा ऐसा ब्रह्मा । एकला होता ।।336।।
मज ईश्वराते नोळखे । ना , सृष्टीही करूं न शके , ।
तो थोरु केला एके । नामे जेणे ।।337।।
जयाचा अर्थु जीवी ध्यांता [6],।जे वर्णत्रयचि जपतां,। 6 मनन केल्याने
विश्वसृजनयोग्यता । आली तया ।।338।।
तेंधवां रचिले ब्रह्मजन [7] । तया वेद दिधले शासन [8] । 7 ब्राह्मण 8 आचरण
यज्ञाऐसे वर्तन । जीविके केले ।।339।। शिकविणारा
पाठी नेणो किती येर । स्त्रजिले लोक अपार ।
जाले ब्रह्मदत्त अग्रहार [9] । तिन्ही भुवने ।।340।। 9 सनदा
ऐसे नाममंत्रे जेणे । धातयां अढंच [10] करणे , । 10 ब्रह्मदेवाला थोर केले
तयाचे स्वरूप आइक , म्हणे । श्रीकांतु तो ।।341।।
तरी सर्व मंत्रांचा राजा । तो प्रणवो आदिवर्णु बुझा [11] । 11 समजा
आणि तत्कारु जो दुजा , । तिजा सत्कारु ।।342।।
एवं , ॐ तत्सदाकारु । ब्रह्मनाम हे त्रिप्रकारु ।
हें फुल तुरंबी [12] सुंदर । उपनिषदाचे ।।343।। 12 वास घे
येणेसी गा होऊनि एक , । जै कर्म चाले सात्त्विक , ।
तै , कैवल्याते [13] पाइक [14] । घरीचे करी ।।344।। 13 मोक्षाला 14 सेवक
परी , कापुराचे थळीव [15] । आणूनि देईल दैव , । 15 दागीना
लेवो जाणणेचि आडव [16] , । तेथ असे बापा ! ।।345।। 16 अडथळा
तैसे,आदरिजेल [17] सत्कर्म,। उच्चरिजेल ब्रह्मनाम , । 17 आरंभ करेल
परी , नेणिजेल जरी वर्म । विनियोगाचे ।।346।।

तरी महंताचिया कोडी । घरा आलियाही , वोढी [1] ।
मानू , नेणता  परवडी [2] । मुद्दल तुटे [3] ।।+347।।
कां , ल्यावया , चोखट । टीक ,भांगार एकवट ।
घालूनि , बांधिली मोट । गळा जेवी ।।348।।
तैसे , तोंडी ब्रह्मनाम , । हाती तें सात्त्विक कर्म , ।
विनियोगेवीण काम । विफळ होय ।।349।।
अगा ! अन्न आणि भूक । पासी असे , परी  देख , ।
जेऊ नेणतां , बालक । लंघनचि की ।।350।।
का , स्नेहसूत्र वैश्वानरा [4] । जालियाही संसारा [5] , ।
हातवटी नेणता [6] , वीरा ! । प्रकाशु नोहे ।।351।।
तैसे , वेळे कृत्य पावे , । तेथिंचा मंत्रुही आठवे , ।
परी , व्यर्थ तें आघवे , । विनियोगेवीण ।।352।।
म्हणौनि , वर्णत्रयात्मक , । जे हें परब्रह्मनाम एक , ।
विनियोगु तूं आइक । आतां याचा ।।353।।

1 आपणहून
2 रीतसर सन्मान न केला
3 असलेले पुण्य नष्ट होते
4 तेल,वात आणि अग्नी 5 एकत्र
6 वापर करण्याचे कसब

**तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपः क्रिया ः ।**
**प्रवर्तन्तें विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ।।24।।**

**तस्मात्  म्हणजे जगाला या संकल्पाने आरंभ झाला आहे  म्हणून, ब्रह्म वादी लोक यज्ञ,दान,तप आणि इतर शास्त्रोक्त कर्मे नेहमी ' ॐ 'असा उच्चार करून  प्रवृत्त होत असतात.**

तरी या नामीची अक्षरे तिन्ही । कर्मा आदिमध्यनिदानी ।
प्रयोजावी , पै, स्थानी । इही तिन्ही ।।354।।
हेचि एकी हतवटी । घेऊनि , हन , किरीटी ! ।
आलें ब्रह्मविद भेटी । ब्रह्माचिये ।।355।।
ब्रह्मेसी होआवया एकी , । ते न वंचती [7]  यज्ञादिकी , ।
जे चावळले [8] , वोळखी । शास्त्रांचिया ।।356।।
तो आदि तंव ओंकारु, । ध्याने करिती गोचरु [9] ।
पाठी आणिती उच्चारु । वाचेही तो ।।357 ।।
तेंणे ध्याने प्रकटे । प्रणवोच्चारे स्पष्टे , ।
लागती मग वाटे । क्रियांचिये ।।358।।
आंधारी अभंगु दिवा , । आडवी [10] समर्थु बोळावा [11] ।
तैसा , प्रणवो जाणावा । कर्मारंभी ।।359।।
उचितदेवोद्देशे । द्रव्ये , धर्म्ये आणि बहुवसे [12] ।
द्विजद्वारां , हन , हुताशे [13] । यजिती पै, ते ।।360।।

7 टाळत नाहीत
8 बोलले
9 प्रत्यक्ष
10 अरण्यात 11 सोबती
12 इतर पुष्कळ
13 अग्नीत

आहवनीयादि [1] वन्ही । निक्षेपरूपी [2] हवनी , ।
यजिती पै विधानी [3] । फुडे होऊनी [4] ।।361।।
किंबहुना , नाना याग । निष्पत्तीचे [5] घेऊनी अंग ।
करिती नावडतेया त्याग । उपाधीचा [6] ।।362।।
कां , न्याये जोडला पवित्री , । भूम्यादिकी स्वतंत्री , ।
देशकाळशुद्ध पात्री । देती दाने ।।363।।
अथवा , एकांतरा कृच्छ्री [7] । चांद्रायाणे मासोपवासी [8]।
शोषोनि गा ! धातुराशी [9] । करिती तपे ।।364।।
एवं , यज्ञदानतपे , । जिये गाजती [10] बंधरूपे , ।
तिहीच होय सोपे । मोक्षाचे तयां ।।365।।
स्थळी[11] नावा जिया दाटिजे[12],।जळी तियांचि जेवी तरिजे।
तेवी , बंधकीं कर्मी सुटिजे । नामे येणे ।।366।।
परी हें असो ; ऐसिया ।या यज्ञदानादि क्रिया , ।
ओंकारे सावायिलिया [13] । प्रवर्तती [14] ।।367।।
तिया मोटकिया[15] जेथ फळी।रिगो पाहाती , निहाळी[16],।
प्रयोजती तिये काळी । तच्छब्दु तो ।।368।।

1 आहवनीय,दक्षिणाग्नी व गार्हपत्य हे तीन अग्नी 2 त्याग 3 प्रकार
4 कुशल होऊन 5 सिद्धी
6 अहंकाररुपी उपाधी
7 एकदिवसाआड भोजन करण्याचे व्रत 8 चांद्रायण व्रतातील महिना महिना उपवास
9 शरीरातील सप्तधातु
1 0 प्रसिद्ध आहे त
11 जमीनीवर 12 जड होतात
13 मदत केल्याने14 सिद्ध होतात
15 अल्प 16 पाहा

**तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपः क्रियाः ।**
**दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकाङक्षिभिः ।।25।।**

**''सत्'' या शब्दाने फलाची आशा न ठेविता यज्ञ,तप व दान वगैरे अनेक प्रकारच्या क्रिया मोक्षार्थी लोक करित असतात.**

जे सर्वाही जगापरौते [17] , । जे एक सर्वही देखतें [18] , ।
जे तच्छब्दे बोलिजें , ते । पैल वस्तु ।।369।।
तें सर्वादिकत्वे चित्ती ।तद्रुप ध्यावूनिया , सुमती ! ।
उच्चारेही व्यक्ती । आणिती पुढती ।।370।।
म्हणती तद्रुपा ब्रह्मा तया , ।'' फळेसी क्रिया इयां , ।
तेचि होतु आम्हां भोगावया । कहीचि नुरो '' ।।371।।
ऐसेनि तदात्मके ब्रह्मे । तेंथ उगाणूनि [19] कर्मे , ।
आंग झाडिती '' न ममे '' । येणे बोले ।।372।।
आतां , ओंकारे आदरिले ,। तत्कारे समर्पिले , ।
इया रिती जया आलें । ब्रह्मत्व कर्मा ।।373।।
तें कर्म कीर ब्रह्माकारे । जाले , तेणेही न सरे , ।
जे करी तेंणेसी , दुसरे । आहे म्हणौनि ।। 374।।

17 जगापलिकडे 18 सर्व द्रष्टे
19 अर्पण करून

मीठ आंगे जळी विरे ,। परी, क्षारता वेगळी उरे, ।
तैसे , कर्म ब्रह्माकारे । गमे , ते द्वैत ।।375।।
आणि, दुजें जंव , जंव घडे, । तंव , तंव संसारभय जोडे , ।
हें देवो आपुलेनि तोंडे । बोलती वेद ।।376।।
म्हणौनि, परत्वे [1] ब्रह्म असे, । ते आत्मत्वे परियवसे [2] । 1 दुसरे पणाचा 2 अनुभवास येतो
"सच्छब्द " या रिणादोषे [3] । ठेविला देवे ।।+377।। 3 उणीव भरून काढण्याकरिता
तरी , ओंकार तत्कारी । कर्म केले जे ब्रह्मशरीरी , ।
जे प्रशस्तादि बोलवरी [4] । वाखाणिले ।।378।। 4 प्रशास्त या शब्दाने
प्रशास्तकर्मी तिये । सच्छब्दा विनियोगु आहे , ।
तोचि आइका , होये । तैसा सांगो ।।379।।

**सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ।**
**प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ।।26।।**

**अस्तिक्य आणि साधुत्व म्हणजे चांगलेपणा या अर्थी " सत् " हा शब्द योजिला जातो; आणि हे पार्था ! तसेच प्रशस्त म्हणजे चांगल्या कर्मासही " सत् " हा शब्द लावण्यात येतो .**

तरी सच्छब्दे येणे , । आटूनि [5] असताचे [6] नाणे । 5 नाश करुन 6 खोटेपणाचे
दाविजें अव्यंगवाणे । सत्तेचे रूप ।।380।।
जे सत् , तेचि काळे , देशे । होऊ नेणेचि अनारिसे , ।
आपणपां आपण असे । अखंडित ।।381।।
हें दिसतें जेतुले आहे , । ते असतपणे [7] जे नोहे , । 7 अनित्यपणे
देखतां रुपी सोये [8] । लाभे जयाची ।।382।। 8 अस्तित्व
तेंणेसी प्रशस्त ते कर्म , । जे जाले सर्वात्मक ब्रह्म , ।
देखिजे , करूनि सम । ऐक्यबोधे ।।383।।
तरी , ओंकार , तत्कारे । जें कर्म दाविले ब्रह्माकारे , ।
तें गिळूनि होइजें एकसरे । सन्मात्रचि [9] ।।384।। 9 केवळ ब्रह्म
ऐसा हा अंतरंगु । सच्छब्दाचा विनियोगु ।
जाणा म्हणे श्रीरंगु । मी ना म्हणे हो ! ।।385।।
ना मीचि जरी हो म्हणे,।तरी श्रीरंगी दुजे, हेचि उणे[10], । 10 उणीव
म्हणौनि , हे बोलणे । देवाचेचि ।।386।।
आतां , आणिकीही परी । सच्छब्दु हा अवधारी ।
सात्त्विक कर्मा करी । उपकारु जो , ।।387।।
तरी,सत्कर्मे चांगे । चालिली अधिकारबगे[11] ,। 11 अधिकार बळाने
परी , एकाधे कां आंगे । हिणावती [12] जै , ।।388।। 12 कमी पडतात

तै उणे एके अवयवे । शरीर ठाके आघवे ।
कां , अंगहीन [1] भांडावे [2] । रथाची गती ।।389।।
1 एखादा भाग नसला की
तैसे , एकेचि गुणेवीण । सतचि , परी ,असतपण ।
2 बंद होतें
कर्म धरी गा ! जाण । जिये वेळे , ।।390।।
तेव्हा ओंकार तत्कारी । सावायिला [3] ,हा चांगी परी [4] ।
3 साह्य झालेले 4 चांगल्या
सच्छब्दु कर्मा करी । जीर्णोध्दारु [5] ।।391।।
प्रकारे 5 प्रशस्त करितो
तें असतपण फेडी , । आणी सद्भावाचिये रुढी ।
निजसत्त्वाचिये [6] प्रौढी [7] , । सच्छब्दु हा ।।392।।
6 त्याच्या खऱ्या सत्त्वाच्या
दिव्यौषध जैसे , रोगिया , । कां सावावो [8] ये भंगलिया [9] ।
योग्यतेला 7 समर्थ 8 मदत
सच्छब्दु ,कर्मा व्यंगलिया [10] , । तैसा जाण ।।393।।
9 व्याधीग्रस्ताच्या 10 सदोष
अथवा , काही प्रमादे , । कर्म आपुलिये मर्यादे ।
चुकोनि , पडे निषिद्धे । वाटे , हन ।।394।।
चालतयाचि मार्गु सांडे , । पारखियाचि अखरे [11] पडे ,।
11 भ्रम
राहाटीमाजी [12] न घडे । काइ , काइ ? ।।395।।
12 व्यवहारात
म्हणौनि , तैसी कर्मा । राभस्ये [13] सांडे सीमा , ।
13 अविचाराने
असाधुत्त्वाचिया दुर्नामा । येवो पाहे जे ।।396।।
तेंथ गा ! हा सच्छब्दु , । येरां दोहीपरीस प्रबुद्धु [14] ।
14 जाणकार
प्रयोजिला , करी साधु । कर्माते यया ।।397।।
लोहा परिसाची घृष्टी , । वोहळा गंगेची भेटी , ।
कां , मृतां जैसी वृष्टी । पीयूषाची ।।398।।
पै , असाधुकर्मा तैसा , । सच्छब्दुप्रयोगु वीरेशा ! ।
हें असो ; गौरवुचि ऐसा । नामाचा यया ।।399।।
घेउनि येथिंचे वर्म , । जै विचारिसी हे नाम , ।
तै केवळ हेचि ब्रह्म । जाणसी तूं ।।400।।
पाहे पां ," ॐ तत्सत् "ऐसे । हे बोलणे तेंथ नेतसे ।
जेथूनि कां हें प्रकाशे । दृश्यजात 15।।401।।
15 सर्व दृष्य वस्तु
तें तंव निर्विशिष्ट [16] । परब्रह्म चोखट ।
16 विशेषरहित
तयाचे हे आंतुवट [17] । व्यंजक [18] नाम ।।402।।
17 अंतर्गत 18 व्यक्त
परी , आश्रयो आकाशा । आकाशचि का जैसा , ।
या नामा , नामी आश्रयो तैसा । अभेदु असे ।।403।।
उदयिला आकाशी , । रवीचि रवीतें प्रकाशी , ।
हें नामव्यक्ती [19] तैसी । ब्रह्मचि करी ।।404।।
19 नाम स्पषट करते
म्हणौनि , त्र्यक्षर हे नाम । नव्हे , जाण केवळ ब्रह्म ।
यालागी कर्म । जे , जे कीजें ।।405।।

**यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते ।**
**कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ।।27।।**
**यज्ञ,तप आणि दान यांच्या ठिकाणी स्थिती म्हणजे स्थिर भावना असणे यालाही 'सत्' असे म्हणतात; व यांच्यासाठी जे कर्म करावयाचे त्या कर्मालाहि 'सत्' हेच नांव आहे .**

तें याग अथवा दाने । तपादिकेही गहने ।
तिये निफजतु[1] ,कां न्युने [2]। होऊनि ठातु[3] ।।406।। 1 पूर्ण 2 अपूर्ण 3 बंद पडतात
परी , परिसाचा वरकली [4] , । नाही चोखाकिडाची बोली , । 4 कसोटीला
तैसी , ब्रह्मी अर्पिता केली , । बह्मचि होती ।।407।।
उणिया पुरियाची परी । नुरेची तेंथ , अवधारी ।
निवडूं न येती सागरी । जैसिया नदी ।।408।।
एवं पार्था ! तुजप्रती । ब्रह्मनामाची हें शक्ती ।
सांगितली उपपत्ती [5] , । डोळसा गा ! ।।409।। 5 व्यवस्था
आणि , येकेकाही अक्षरा । वेगळवेगळा वीरा ! ।
विनियोगु , नागरा [6] । बोलिलो रीती ।।410।। 6 सोप्या भाषेत
एवं , ऐसे सुमहिम [7] ।म्हणौनि हे ब्रह्मनाम , । 7 श्रेष्ठ
आतां , जाणितले की सुवर्म । राया तुवां ? ।।411।।
तरी , येथूनि याचि श्रद्धा । उपलविली [8] हो सर्वदा । 8 विस्तारिली
जयाचे जाले, बंधा । उरो नेदी ।।412।।
जिये कर्मी हा प्रयोगु । अनुष्ठिजें , सद्विनियोगु ।
तेंथ अनुष्ठिला , सांगु । वेदुचि तो ।।413।।

**अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।**
**असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ।।28।।**
**अश्रद्धेने जे हवन केले, जे दान दिले, जे तप आचरिले, आणि जे काही कर्म केले ते 'असत् 'म्हटले आहे . हें पार्था! ते कर्म मेल्यावर परलोकी नाही , आणि या लोकीही लाभत नाही .**

ना , सांडूनि हे सोये [9] , । मोडूनि श्रद्धेची बाहे [10] । 9 मार्ग 10 आधार
दुराग्रहाची त्राये [11] । वाढऊनियां , ।414।। 11 बळ
मग अश्वमेध कोडी कीजें , । रत्ने भरोनि पृथ्वी दीजे , ।
एकांगुष्ठीही तपिजे । तपसाहस्त्री ।।415।।
जळाशयाचेनि नांवे , । समुद्रही कीजती नवे ।
परी किंबहुना आघवे । वृथाचि ते ।।416।।
खडकावरी वर्षले , । जैसे , भस्मी हवन केले , ।
का खेव दिधले [12] । साऊलिये ।।417।। 12 आलिंगन दीले

नातरी , जैसे चडकणा [1] । गगना हाणितले , अर्जुना ! ।
तैसा , समारंभु  सुना [2] । गेलाचि तो ।।418।।
घाणां गाळिले गुंडे [3] , । तेथ तेल ना पेंडी जोडे , ।
तैसे , दरिद्र तेवढे । ठेलेचि आंगी ।।419।।
गाठीं बांधली खापरी , । येथ अथवा पैलतीरी ।
न सरोनि [4] , जैसी मारी । उपवासी गा ! ।।420।।
तैसे कर्मजाते तेंणे । नाही ऐहिकीचे [5]  भोगणे , ।
तेंथ परत्र ते कवणे । अपेक्षावे ? ।।421।।
म्हणौनि , ब्रह्मनामश्रद्धा । सांडूनि , कीजे जो धांदा , ।
हें असो ; सिणु  [6] नुसधा । दृष्टादृष्टी  [7] तो ।।422।।
ऐसे कलुषकरिकेसरी [8] । त्रितापतिमिरतमारी [9]।
श्रीवर वीर नरहरी । बोलिले तेणे ।।423।।
तेंथ,निजानंदा बहुवसा-।माजी [10] अर्जुन तो सहसा [11] ।
हरपला , चंद्रु जैसा , । चांदिणेनि ।।424।।
अहो ! संग्रामु हा वाणिया [12],। मापे नाराचांचिया आणिया[13]।
सूनि , माप घे मवणिया [14]  । जीवितेसी ।।425।।
ऐसिया समयी कर्कशे , । भोगीजत स्वानंदराज्य कैसे ! ।
आजी भाग्योदयो हा नसे । आनी ठाई ! ।।426।।
संजयो म्हणे,'' कौरवराया ! । गुणा रिझो[15] ये  रिपुचिया ।
आणि , गुरुही हा अमुचिया । सुखाचा येथ ।।427।।
हा न पुसता हे गोठी , । तरी देवो कां सोडिते गाठीं ? ।
तरी , कैसेनि आम्हा भेटी ? । परमार्थेसी ।।428।।
होतो अज्ञानाच्या आंधारा,। वोसंतीत जन्मवाहरा [16] ।
तो , आत्मप्रकाशमंदिरा-। आंतु आणिले ।।429।।
येवढा आम्हा ,तुम्हा थोरु , । केला येणे उपकारु , ।
म्हणौनि , हा व्याससहोदरु । गुरत्वे [17] होय '' ।।430।।
तेवीचि संजयो म्हणे चित्ती , । हा अतिशयो , या नृपती ।
खुपेल , म्हणौनि '' किती । बोलत असो '' ।।431।।
ऐसी हे बोली सांडिली , । मग येरीची गोठी आदरिली ।
जे , पार्थे कां पुसिली । श्रीकृष्णाते ।।432।।
याचे जैसे का करणे , । तैसे , मीही करीन बोलणे , ।
'' ऐकिजो '' , ज्ञानदेवो म्हणे । निवृत्तीचा ।।433।।

1 चापटीने
2 व्यर्थ
3 दगड
4 उपयोगास न येता
5 इहलोकीचे
6 श्रम 7 इहलोकी व परलोकी
8 पापरुपी हत्तीचा नाश करणारा सिंह 9 त्रिविध तापरुपी अंधाराचा नाश करणारा सूर्य
10 ब्रह्मानंदामध्ये 11 एकदम
12 दुकानदार
13 तीक्ष्ण बाणांची टोके ही मापे 14 मोजण्याकरिता
15 प्रेम येते
1 6 जन्माच्या येरझाऱ्या सोशीत होतो
17 व्यासांचा भाऊ इतका श्रेष्ठ

**इति श्रीमद्भवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे**
**श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशो ऽ ध्यायः ।।17।।**

# कठीण ओव्यांचा अर्थ

1. तुझी ब्रह्मात्मैक्य योगरुप सर्वोत्कृष्ट योगनिद्रा आहे ती मुमुक्षुस लाभते तेव्हा ती विश्वात्मक स्वरूपाने विकसित, प्रफुल्लित झालेल्या आकारास विक्षेप मुद्रेस बाधित करते,विश्वविकसित मुद्रा ब्रह्मात्मैक्य योगरुपी अद्वय निद्रेने बोधस्थितीने मावळविणाऱ्या , हे गणेशस्वरुप श्रीगुरुराया तुला नमस्कार असो.
2. सत्त्व,रज,तम या त्रिगुणात्मक त्रिपुरांनी वेढलेला व जीवत्वरुपी संकटात सापडलेला जो आत्मरुपी श्रीशंकर आहे त्याने श्रीगुरुरुपी गणपतीचे स्मरण करून देहादी बंधनातून ,जीवदशेतून सोडविले .
3. म्हणून श्रीशंकराबरोबर हे श्रीगुरो! तुमची तुलना करून पाहीली असता तू आपल्या गुरुत्वामुळे अधिक वजनदार आहेस . असे असूनही आपण मायारुप जलातून जीवास तारून नेण्याविषयी हलकेही आहात.
4. तुमच्या यथार्थ ब्रह्मस्वरुपाविषयी जे अज्ञानी आहेत त्यांचेसाठी तुम्ही वक्रतुंड असल्याचे दिसता, जे तुमचे यथार्थ स्वरूप जाणतात त्या ज्ञान्यांकरिता नित्य सरळ सन्मुखच आहात.
5. हे गणेशस्वरुप श्रीगुरुराया, आपली सूक्ष्म दृष्टी पाहिली असता ती परमार्थात अत्यंत निर्विशेष अशी आहे . तरीही त्यांच्या उघडझापीने आपण जगताचे उत्पत्ती व नाश दोन्ही लीलेने करता.
6. हें श्रीगुरो! आपल्या प्रवृत्तिरुप कानाच्या हालविण्याने संसाररुपी हत्तीच्या गंडस्थळातून वाहणाऱ्या वैषयिक सुखात्मक मदस्त्रावाच्या सुगंधाने युक्त असा वायू सुटून त्यात लुब्ध झालेल्या जीवरूपी भ्रमराच्या नीलकमलांनी जणू तुमची पूजाच केली आहे . असे तुमचे गंडस्थळ शोभते.
7. नंतर निवृत्तिरूप दुसऱ्या कानाच्या हालविण्याने अंतर्मुखवृत्ती होऊन तुमची जीवभ्रमराच्या नीलकमलांनी बांधलेले ती पूजा उधळून जाते. तेव्हा आपण आपल्या मोकळ्या अंगाच्या लेण्यानेच प्रवृत्ति-निवृत्ति-लक्षणरूप धर्म मिरविले जाता .
8. आपल्या डाव्या मांडीवर बसलेल्या मायाशक्तीची नृत्यक्रीडा म्हणजेच हा जगत्रुपी प्रत्यक्ष भासणारा नामरुपात्मक विश्वाभास आहे व तोच जगत्रुपी आभास आपल्या तांडवनृत्याच्या निमित्ताने अभिव्यक्त करून त्यात भासणाऱ्या आपल्या सच्चिदानंद प्रतीतिस्वरूपाने ; जगत् व्यवहार चालवून एक कौशल्यच दाखवीत आहात.
9 हे असो, हे श्रीगुरो!आपण ज्याचे सोयरे होता तो सोयरीकीच्या व्यवहारासच मुकतो व आपल्या अद्वयानंद स्वरूपास मिळतो हा मोठा नवलाव आहे !
10. तुम्ही जीवाचे अज्ञान वा अज्ञानकार्य बंध यांचा ठावठिकाणाही नाहीसा करता.म्हणून आपण जगतबंधु आहात. हेही उचितच आहे . असा अभिप्राय धरून जे मोठ्या आनंदाने आपला आश्रय धारण करण्यास आत्मभावाने शरण येतात त्यामुळे जगत्बंधु हें नांव सार्थ ठरते.
11 जे तुला श्रीगुरुदेव या भावाने शरण येतात त्यांचा द्वैतपणाच्या नांवाने देहसुद्धा वेगळा शिल्लक राहु देत नाहीस. कारण हे देवराया, त्या दुसऱ्यास तू अद्वय स्वस्वरुपच करतोस आणि देहरहित ब्रह्मस्थितीकालात सर्वांचा अभाव करून अद्वय एकच एक ब्रह्म उरवितोस .
12. या उलट तुला जे पुढे करून म्हणजे ' ज्ञानाचा विषय आहेस' असे समजून , तुला परिच्छिन्न समजून साधनद्वारा तुझी प्राप्ती करून घेण्याकरिता अनंत साधनांच्या धावा करीत सुटतात त्यांना तू अज्ञात व अप्राप्तवत राहतोस.
13. जे ध्यान करण्याच्या निमित्ताने मनात आणू पहातात त्याच्याकरिता तू त्यांच्या ध्यानात सीमित विषय होऊन सापडत नाहीस. इतकेच नव्हे तर जे तुझ्या सर्वव्यापक ज्ञानाने तुझें ध्यान करण्याचेही विसरतात, त्यांचेवर आपली अतिप्रती असते.

14. जे तुला नित्य, स्वतःसिद्ध अशा रूपाने जाणत नाहीत तें विद्वान या जगात सर्वज्ञत्वादी नांवाने वावरत असले व साधनद्वारा वाङमय चातुर्यद्वारा वेदाएवढे अर्थभरित बोलणे करीत असले तरीही तू शब्दादिकास अविषय राहतोस.

15. मौन हेच तुझें जन्मराशीवरून काढलेले नांव आहे . त्यामुळे तुझी स्तुती करण्याची उत्कट इच्छा मी कशी करावी? हे सर्व दृश्यमान जगत भासत आहे . ती सर्व आपली माया आहे तर मग मी तुझें भजन तरी करावे कसे?

16. देवा! मी आपला सेवक होऊन पाहीन तर आपल्या अखंड अद्वय स्वरूपात सेव्यसेवक भावामुळे द्वैत निर्माण करीत असल्यामुळे, माझ्या पदरात आपला द्रोहच येईल. म्हणून, महाराज ! आपल्या संबंधाने आतां सेवक,भजन इत्यादी काहीही विशेष होणार नाही .

17. ज्या वेळी सर्व साधनांच्या द्वारा व अनात्म्यापैकीं किंवा सेवकभक्त इत्यादीपैकी मी कोणीही नाही असे निश्चित व्हावे, त्या वेळीच आपल्या अद्वय स्वरुपाची ओळख होईल. हें आराध्य देवता ! वंदनीय देवा! श्रीगुरुराया! हे तुमचे वर्म मी जाणतो.

18. मीठ ज्याप्रमाणे पाण्यापासून वेगळे उरू न देता पाण्यात ऐक्यास पावते त्याप्रमाणे माझे ऐक्यबोधानेच नमन आहे असे समजा. यापेक्षा अधिक विशेष काय बोलावे ?

19. आतां असे पहा की, रिकाम्या घागरीने समुद्रात प्रवेश केला असता ती जशी पाण्याने उचंबळून भरून वर निघते किंवा दिव्याच्या संसर्गाने वातही जशी दीपस्वरूपच होते.

20. त्याप्रमाणे हे श्रीगुरो! हे श्रीनिवृत्तिनाथा! तुम्हाला ऐक्यरुपाने नमस्कार केल्याने मी परिपूर्ण ब्रह्म कृतकृत्य झालो आहे . आतां तो गीतेचा अर्थ व्याख्यानात आणून प्रकट करीन.

47. काळ हा स्वभावतांच बलाढ्य , अलौकि,व भव्य आहे , आणि अद्वयतत्त्व हे अगम्य व आनंदमय आहे .

48. पण यांनाही ज्या सामर्थ्याने श्लाघ्यता प्राप्त होतें, ते सामर्थ्य ज्यांच्याठायी ओतप्रोत भरले आहे , असे तें भगवान स्वतः बोलतें झाले.

185 राजा श्राद्धास आला म्हणजे व्यावहारिक फायदा सहज होतो. लोकांना वाटते याचा मोठा वशिला आहे . जगात कीर्ती होतें व श्राद्धही पार पडतें .

332. ब्रह्म हे बोलाच्या पलीकडचे आहे . तो त्याचा अबोला फिटावा म्हणून त्याला श्रुतीनी मोठ्या करुणेने ॐ हें सांकेतिक नाम ठेविले आहे . त्या नांवाने हाक मारली म्हणजे तें 'ओ' म्हणून प्रतिसाद देतें व जीवास अद्वैतत्वाने भेटतें .

347 असंख्य साधुजन घरी आलें असतां त्यांचा रीतसर आदरसत्कार न घडल्यास पदरी असलेली पुण्याई नष्ट होतें

377. म्हणून कर्तुत्वाच्या अभिमानाने जे ब्रह्म आपणाहून पर वाटते , ते आपल्याच स्वरुपाने प्रत्ययास यावे या उद्देशाने 'सत्' शब्द राखून ठेवला आहे .